
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.
सन १९१७

# मोगऱ्याचीं फुलें

## गुच्छ ३



ग. रा. मोगरे.

। विविधज्ञानविस्तार ऑफिसांत आणि
ारायण छापखान्यांत विकत मिळतील.


REFBK-0001470

काव्य ३८४



कविवर—

(कै.) गंगाधर रामचंद्र मोगरे.



कवि-मित्र—

रा. सा. रामकृष्ण रघुनाथ मोरमकर.



कविवर—

(कै.) गंगाधर रामचंद्र मोगरे.



कवि-मित्र—

रा. सा. रामकृष्ण रघुनाथ मोरमकर.

# मोगऱ्याचीं फुलें

अर्थात्

## गंगाधर रामचंद्र मोगरे

यांची कविता.

### गुच्छ ३.

REFBK-0001470

अनुक्रमणिका—

१ पडवीचा पाडवा.
२ मेथाजीची मजलस.
३ अभिनवधर्मस्थापना.

१८५०

प्रथमावृत्ति, १०००.

आक्टोबर, १९१७.

[ किंमत ६ आणे. ]

गुच्छ १, २, व ३ एकत्र, किंमत एक रुपया.

प्रकाशकः—नाडकर्णी आणि मंडळी यांच्यासाठीं

अनंत आत्माराम मोरमकर, ८१ फणसवाडी, मुंबई.

प्रिंटरः—कृष्णराव सखाराम पाटकर, श्रीलक्ष्मीनारायण प्रेस,

४०२, ठाकुरद्वार, मुंबई.

प्रकाशनाचे सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रकाशकांचे दोन शब्द.

'मोगऱ्यांच्या फुलां'चा हा तृतीय गुच्छ वाचकांच्या हातीं देण्यास आम्हांस परमानंद होत आहे. गंगाधरपंतांच्या मृत्यूनंतर हा गुच्छ प्रथमतःच प्रसिद्ध होत असल्यामुळें, त्यांच्या कोणी तरी सहृदय रसिक मित्रानें याची प्रस्तावना लिहून तींत मोगऱ्यांच्या कवितेचे विशेष काय आहेत ते सांगावे अशी आम्हांस इच्छा झाली; आणि त्याप्रमाणें आम्हीं गंगाधरपंतांचे फार वर्षांचे स्नेही आणि मार्मिक लेखनपटु रा. रा. हरिभाऊ आपटे यांस प्रस्तावना लिहिण्यासाठीं विनंती केली. त्यांनींही ती आनंदानें मान्य केली. त्याप्रमाणें घडून येण्यास थोडा विलंब लागला ही गोष्ट जरी खरी आहे, तरी हरिभाऊंच्या बहुविध व्यासंगांकडे लक्ष देऊन आणि त्यांचा पुढील मार्मिक गुणदोषविवेचक उपोद्घात वाचून या विलंबाबद्दल उपेक्षा करणेंच वाजवी होईल.

गंगाधरपंत हयात असतां त्यांनीं आपला फोटो आपल्या काव्यपुस्तकांत प्रसिद्ध होऊं दिला नाहीं. तो प्रथमतःच या गुच्छांत प्रसिद्ध करीत आहों. त्यालगतच, ज्या त्यांच्या मित्राच्या प्रोत्साहनानें त्यांची बरीचशी कविता अस्तित्वांत आली आणि ज्यास हा गुच्छ अर्पण करण्याचा त्यांचा निश्चय ठरला होता, त्या त्यांच्या मित्राचाही फोटो देऊन, उभयतांच्या चिरस्नेहाचें स्मारक म्हणून हा गुच्छ महाराष्ट्रकाव्याच्या भोक्त्यांस सादर करीत आहों. तो त्यांस पूर्वीच्या दोन गुच्छांप्रमाणेंच मोददायक होवो.

या तीन गुच्छांशिवाय मोगरे यांची बरीच कविता इतस्ततः पसरलेली आहे; आणि तिचे या गुच्छाएवढे, किंवा याहून मोठे असे, दोन गुच्छ होतील; तेही लवकरच वाचकांच्या हातीं पडतील अशी उमेद आहे.

चवथ्या गुच्छांत पुढील स्फुट प्रकरणें येतील:—

१ खरी राजनिष्ठा; २ पुस्तकावर अभिप्राय; ३ माझा संसार; ४ माधवबाग; ५ 'काका' अथवा एक स्वप्न; ६ तापसीबाई; ७ बाजीराज्यवियोग; ८ तेलंगांचें अभिनंदन; ९ भिक्षुक, शास्त्री, पुराणिक; १० नूतन वधूवरांस; ११ शारदोत्सव; १२ इलियड; १३ देव म्हणजे काय? १४ सुस्वागतम्; १५ हार्डिंग-जन्मदिनोत्सव; १६ महाराष्ट्रजन-विज्ञापना; १७ संक्रांतीचा तिळगुळ; १८ स्वागतम्, सुस्वागतम्; १९ राष्ट्रगीत; २० राजगीत; २१ आर्यमातृसंदेश; २२ म. सा. पत्रिका; २३ पांचवे जार्ज आणि मेरी.

पांचव्या गुच्छांत पुढील प्रकरणांचा समावेश होईल:—

१ आर्यमातृविलाप; २ सन १८७८ चा दुष्काळ; ३ मुरारजी गोकुळदासनिधन; ४ विष्णुशास्त्रीपंडित; ५ दयानंदनिधन; ६ तुकोजीराव होळकर; ७ जयाजीराव शिंदे; ८ वि. ना. मंडलिक; ९ अण्णा किर्लोसकर; १० हरि माधव पंडित; ११ राणी व्हिक्टोरिया; १२ भाऊ कोल्हटकर; १३ आनंदीबाई जोशी; १४ फर्ग्युसनविलाप.

याशिवाय मोगरे यांची अप्रसिद्ध कविता कोणास माहीत असल्यास त्यांनीं आम्हांस कळविण्याची कृपा करावी. म्हणजे वरील गुच्छांत तिचा समावेश करितां येईल.

# उपोद्घात.

माझे मित्र कविवर्य कै. मोगरे यांच्या काव्यपुष्पांचा हा तिसरा गुच्छ त्यांच्या अनेक रसिक वाचकांस समर्पण करण्यांत येत आहे. हा गुच्छ तयार होऊन बराच काल झाला. परंतु या गुच्छाला हिरव्या पानांचें वेष्टण करण्यासाठीं जें सूत्र बांधावयाचें तें माझ्या हातून बांधलें जावें अशी गुच्छकारांची उत्कट इच्छा त्यांनीं दाखविली व त्या लहानशा कार्यासाठीं मला वाजवीपेक्षां अधिक अवधीही दिला, याबद्दल मी त्यांचे फार फार आभार मानतों. त्याचप्रमाणें हें लहानसें–आणि तेंही कच्चें–सूत्र बांधण्याला मीं फार अवकाश लावल्यामुळें रसिकांस त्या गुच्छाच्या सुगंधाचा आनंद मिळण्याला विनाकारण अवधि लागला, याबद्दल त्यांचीही मी मन:पूर्वक माफी मागतों.

कविवर्य मोगरे हे स्वर्गस्थ झाल्यानंतर त्यांच्या रसिक वाचकांस अर्पण केला जाणारा हा पहिलाच गुच्छ होय. पहिले दोन गुच्छ त्यांच्या हयातींतच प्रसिद्ध झाले होते. पहिल्या गुच्छांत पांच शोकप्रकरणें व एक 'मराठी ग्रंथकारांस प्रार्थना' हें प्रकरण मिळून सहा प्रकरणें ग्रथित केलीं आहेत. दुसऱ्यांत दहा प्रकरणें आहेत, तीं विविध विषयांवर आहेत. आणि आतां तिसऱ्यांत त्यांचीं तीन उपहासोक्तिप्रकरणें प्रसिद्ध करण्यांत येत आहेत. या तीन प्रकरणां-विषयीं विशेष कांहीं लिहिण्यापूर्वीं कवीच्या चरित्राविषयीं व चारित्र्याविषयीं थोडें लिहूं. त्याचप्रमाणें कवि या दृष्टीनें यांच्या प्रतिभादि गुणांविषयींही थोडा विचार करूं.

१

# कवीचें चरित्र.

गंगाधरपंत इ. स. १८५८ सालीं शिरगांव येथें जानेवारी महिन्याच्या १८ वे तारखेस जन्मले. त्यांचें प्राथमिक शिक्षण त्यांच्या गांवींच झालें. नंतर ते मुंबईस येऊन इंग्रजी शाळेंत शिकूं लागले. इ. स. १८७३ सालीं ते जगन्नाथ शंकरशेटजींच्या शाळेंत प्रविष्ट झाले. त्या शाळेंत व पुढें एल्फिन्स्टन हायस्कुलांत मिळून त्यांचा प्रवेशपरीक्षेपर्यंत इंग्रजी अभ्यास झाला. लहानपणापासून त्यांची शरीरप्रकृति फार नाजुक. यामुळें पुढला कॉलेजांतला अभ्यासक्रम आपणास झेंपावयाचा नाहीं असा विचार करून, कोठें तरी मुंबईतल्या मुंबईतच नोकरी करून आपला पुढचा आयु:क्रम कायम करावयाचा, असा त्यांनीं निश्चय केला. त्याप्रमाणें त्यांना ब्यांकेंत नौकरीही मिळाली. परंतु ती नौकरी फार दगदगीची असल्यामुळें ती सोडून त्यांनीं १८८६ सालच्या अखेरीस रॉयल एशिआटिक सोसैटीच्या मुंबई शाखेच्या लायब्ररींत नौकरी धरली. या लायब्ररीच्या मुख्य जागेपर्यंत चढत जाऊन कांहीं दिवस ते तेथील लायब्रेरिअन होते. कविवर्य मोगरे यांना पद्यें लिहिण्याची आवड मराठी शाळेंतच प्रथम उत्पन्न झाली. तशांत पुढें वर सांगितलेल्या प्रचंड पुस्तकालयांत त्यांचे आठ आठ तास जाऊं लागले. तेथें त्यांना वाचनाचा व्यासंग ठेवण्यास फारच उत्तम असा प्रसंग व स्थान हीं मिळालीं. अर्थात् मूळचा कवित्वाचा अंकुर अनेक प्रतिभासंपन्न कवींच्या कृतींच्या परिशीलनामुळें जोरावत जाऊन तो वृक्षत्व पावला; इतकेंच नव्हे, तर तो पुष्पितही झाला. प्रस्तुतच्या तीन गुच्छांत त्या पुष्पांचें वर्णमाधुर्य व गंधमाधुर्य हीं वाचकांस प्रत्यक्ष अनुभवावयास सांपडत आहेत.

मोगरे यांचें काव्यपरिशीलन फार दांडगें आणि अतिशय मार्मिक असे. इंग्लंडांतल्या बहुतेक श्रेष्ठ कवींच्या काव्यकृतींचा दृढ परिचय त्यांनीं करून घेतला होता. त्याचप्रमाणें इंग्रजी भाषांतरांच्या द्वारें फ्रान्स, जर्मनी, इटली, ग्रीस वगैरे देशांतील प्राचीन व अर्वाचीन कवींच्या काव्यांचाही रसपरिपाक त्यांनीं आस्वादिला होता. या अध्ययनाचा त्यांच्या स्वतःच्या नैसर्गिक काव्योन्मेषावर अप्रत्यक्ष परिणाम झाला यांत कांहींच नवल नाहीं. मोगरे हे फार सहृदय होते. वर सांगितल्याप्रमाणें त्यांचा काव्य-वाचनाचाच व्यासंग मोठा होता असें नाहीं; इतर वाङ्मयात्मक पुस्तकांचेंही त्यांचें वाचन फार होतें. कोणच्या विषयावर कोणचीं ताजीं पुस्तकें झालीं आहेत आणि त्यांचे विशेष काय आहेत, याविषयीं चांगली माहिती त्यांचेजवळून मिळत असे.

त्यांचा स्वभाव फार निरभिमानी, निर्मत्सर आणि सरळ असा होता. ते सामान्यतः मितभाषी असत; परंतु निवडक स्नेही जमले असतां त्यांचें संभाषणचातुर्य आणि नर्ममर्मज्ञता यांचा प्रत्यय त्यांच्या मित्रमंडळीस येत असे. अशा संवादांतच त्यांच्यापासून त्यांच्या स्नेही मंडळीस अनेक कवींच्या काव्यांचें व तत्संबंधीं नवीन नवीन निघणाऱ्या पुस्तकांचें ज्ञान मिळत असे. शेक्सपिअरच्या नाटकांविषयीं त्यांना फार प्रेम असे, परंतु तीं नाटकें शेक्सपिअरनें लिहिलीं नसून बेकननेंच खरोखरीं लिहिलीं या वादाचे ते पुरस्कर्ते असत. या बाबतींत त्यांचे व माझे दोन तीन वेळां वाद झाले. कां कीं, बेकनच्या ठायीं त्या सुंदर नाटकांचें कर्तृत्व कल्पिण्याला अणुभरही आधार नाहीं, आणि बेकनची बुद्धि कितीही विशाल असली तरी त्याला काव्यप्रतिभेचा गंधही नव्हता, असें माझें मत आहे. असो. हें त्यांचें मत सहज जातां जातां सांगून ठेवण्याजोगें वाटलें म्हणून सांगितलें. मोगरे हे फार विनय-

संपन्न होते. त्यांचीं मतें प्रगतिपर होतीं. त्यांचा देशाभिमान व भाषाभिमान हे अत्यंत तेजस्वी होते; आणि ही तेजस्विता त्यांच्या काव्यांतही दिसून येते.

## २

## काव्याचे घटकावयव.

हल्लींच्या काळीं इंग्रजी व इतर युरोपीय देशांतील काव्यांचें परिशीलन झाल्याकारणानें, कोण्याही कवीच्या काव्यकृतींचा विचार करीत असतां, हा कवि कोण्या इंग्रज कवीशीं तुलावयास येईल ?–कोण्या परकी कवीचे गुण याच्या कृतींत अधिक सांपडतात ?–असे प्रश्न सहजच मनांत उद्भवतात, आणि विचक्षणांकडून विचारलेही जातात. हे प्रश्न उद्भवणें आणि त्यांचीं उत्तरें देण्यासाठीं प्रयत्न होणें, हें अगदीं स्वाभाविकच आहे. कारण, महाराष्ट्र भाषेंत नवीन तऱ्हेच्या काव्यकृति निर्माण होऊं लागल्या असें आपण म्हणतों याचा अर्थच हा कीं, सद्य:कालीं जी नवी परिस्थिति उत्पन्न झाली आहे, त्या परिस्थितीच्या कारणांचा आमच्या विचारांकल्पनांवरही परिणाम झाला आहे. ज्ञानेश्वर एकनाथादिकांनीं उपनिषदें, गीता, भागवत इत्यादि ग्रंथांच्या आधारानें आपल्या कालीं लोकांस मुख्यत: वेदान्त पढविला.. नामदेव तुकारामांनीं भक्तिमार्ग चोखाळून दिला. मुक्तेश्वर मोरोपंतांनीं महाभारतादि ग्रंथांचें सारसर्वस्व आपल्या श्रोत्यांपुढें ठेविलें. श्रीधरादिकांनीं इतर कांहीं अल्प स्वल्प पुराणें, स्तोत्रें वगैरे मराठींत सादर केलीं. आणि पुढें नवीन परकी राज्य येण्याबरोबर राज्यकर्त्यांच्या काव्यग्रंथांच्या परिशीलनास प्रारंभ होऊन तशीं काव्यें निर्माण होण्याच्या दर्म्यान संस्कृत कवि व नाटककार यांच्या काव्यांनाटकांचीं भाषांतरें करण्याकडे कांहीं रसिक पंडितांची प्रवृत्ति

झाली. त्या भाषांतरांनंतर आंग्लकवींच्या काव्यग्रंथांच्या वाचनानें आलेल्या नवीन स्फूर्तीच्या अनुषंगानें व संस्कृत कवींच्या धरतीवर मराठी काव्यें निर्माण होऊं लागलीं. या शेवटल्या कोटींतल्या काव्यांत मोगरे यांच्या काव्यांची प्रमुखतेनें गणना होते. प्रसन्न व सरळ मराठी भाषापद्धति, कालिदासादिकांची अर्थालंकारयोजना, आणि पोपसारख्या कवींच्या विचारपद्धति, या तिहींचें आल्हाद-दायक मिश्रण मोगरे यांच्या काव्यांतून दिसतें.

काव्यपृथक्करण केलें तर काव्याचे घटकावयव तीन दिसतातः नाद, अर्थ व ध्वनि. या तीनही शब्दांना अन्वर्थक इंग्रजी शब्द द्यायचे तर ते अनुक्रमें Sound, Sense व Suggestion असे देतां येतील. परंतु नाद या शब्दाला Sound हा शब्द सर्वथा अन्वर्थक नाहीं; कारण नाद यांत तालबद्धता व माधुर्य सूचित होतात तीं नुसत्या Sound या शब्दांत होत नाहींत. या अवयवत्रयीची अत्यंत प्रमाणशील घटना झालेली दिसली म्हणजे रसिक जनांना काव्यानंद हा झालाच पाहिजे. नुसती शब्दरचना म्हणजे काव्य नव्हे. ती नादवती, अर्थवती आणि ध्वनिवती पाहिजे. शब्द यथोचित पाहिजेत, बाह्यार्थ सुंदर पाहिजे, आणि त्या बाह्यार्थाच्या अंतरंगीं असणारा अर्थ–जो रसिकानें आपल्या रसिकतेनेंच काढावा लागतो–तो अर्थही फार सुंदर पाहिजे. या तीन काव्यघटकावयांत तरतमभाव आहे हें उघडच आहे. नुसत्या नादयुक्त शब्दांच्या रचनेनेंच काव्य होत नाहीं.परंतु तसल्या रचनेसच सामान्य लोक काव्य समजतात. बाह्यार्थपरिपाकाला महत्त्व काय आहे, हें त्यांना समजत नाहीं. त्याहून वरच्या दर-ज्याचे लोक बाह्यार्थपरिपाकाचें महत्त्व समजतात; परंतु त्यांना अंतरंगार्थ–ज्याला ध्वनि म्हणतात तो–समजण्याचें सामर्थ्य नसल्या-मुळें त्याचें महत्त्वही त्यांचे ध्यानांत येत नाहीं. खरे रसिक आहेत ते

मात्र काव्याची परीक्षा करावयाची ती काव्याच्या शब्दरचनेंतील नाद, अर्थ व ध्वनि या तिहींवरून करतात.

याला आपण आम्रफलाचें उदाहरण घेऊं. वर्णानें शेंदऱ्या, लाल किंवा पिवळा जर्द झालेला असा आंबा पाहिला कीं साधारण माणसांचे डोळे लोभावतात. तो चाखल्यावर गोड आंबट जसा असेल, त्याप्रमाणें त्यांना संतोष किंवा असंतोष होतो. परंतु तो गोड लागून शिवाय त्यांतील रसाला विशेष लजत–विशेष प्रकारचा स्वाद लागला, तर त्यावर कांहीं लोक त्या फळाचें महत्त्व मोजतात. लहान मुलें, अज्ञजन आणि सुज्ञजन हे जसे सामान्यतः तीन लोकवर्ग आहेत, तसेच काव्याच्या रसिकांतही तीन वर्ग पडतात. एक वर्णलुब्ध किंवा नादलुब्ध, दुसरा अर्थलुब्ध, व तिसरा ध्वनि-लुब्ध. आम्रफलपरिपाकाप्रमाणेंच काव्यफलाचा परिपाक असतो. तो अंबा सर्वांत उत्कृष्ट कीं ज्याचा रंग सुंदर, ज्याची रुचि गोड आणि ज्याचा स्वादही अत्यंत मधुर. परंतु हा अंतःस्थ स्वाद समजणारे रसिक फार थोडे, अगदीं विरळ. तसेंच काव्याच्या अंतरंगांतील ध्वनीचे ज्ञाते रसिक अत्यंत विरळ. तें ज्ञान होण्यास कवीच्या हृदयासारखेंच वाचकाचेंही हृदय असावें लागतें. कवि-तेच्या वाचनानें वाचकांच्या हृदयांतलें कवित्व जागृत व्हावें लागतें. अर्थात् तोच कवि खरोखर मोठा कीं ज्याच्या काव्यानें प्रत्येक वाचकाच्या हृदयांतलें कवित्व जागृत होतें. हें प्रत्येकाच्या हृदयांतलें कवित्व जागृत करण्यास वर सांगितलेले तीनही गुण–नाद, अर्थ आणि ध्वनि–कवीच्या कृतींत असावे लागतात. या तीनही गुणांचें अस्तित्व ज्या कविकृतींत असेल ती कविकृति अज्ञ, सुज्ञ व विशेषज्ञ या तिघांस सारखाच मोह घालते. एक तुका-रामोक्ति घ्याः—

'सिंचन करितां मूळ । वृक्ष ओलावे सकळ ॥'

या शब्दरचनेंत किती स्वरमाधुर्य आहे, किती अर्थसौंदर्य आहे आणि किती ध्वनिवैपुल्य आहे,हें काय कोणाला समजावून सांगितलें पाहिजे ? अमका कवि मोठा प्रासादिक आहे, अमक्या कवीच्या काव्यांत प्रसाद हा गुण ओतप्रोत भरला आहे,याचा अर्थ काय ? कित्येक असें म्हणतात कीं, पद्याचा अर्थ सोप्या शब्दांत व्यक्त केलेला असला म्हणजे तें काव्य झालें व त्यांत प्रसाद हा गुण आला. परंतु प्रसाद या शब्दाचा किती कोता, किती अपुरा असा हा अर्थ आहे ! ज्या गुणाच्या अस्तित्वामुळें रसिकाचें मन प्रसन्न होईल तो प्रसाद होय. असें मन प्रसन्न होण्याला सहज समजण्याजोगा अर्थच तेवढा कारण होत नाहीं. "मेंढयावरी लोंकर दाट भारी" याचा अर्थ सहज समजतो म्हणून हें काय प्रसादगुणयुक्त काव्य होईल ? त्या अर्थांत चित्ताला आकर्षण करण्याचा गुण पाहिजे; चमत्कृति पाहिजे. वर सांगितलेल्या तीन गुणांपैकीं पहिले दोन तरी प्रत्येक काव्यांत कमी अधिक मानानें असावयाचेच. परंतु तिसरा फार विरल असतो. यास्तवच वर एकवार मीं सांगितलें आहे कीं या गुणांच्या महत्त्वांत तरतमभाव आहे. केवळ शब्दमाधुर्य किंवा स्वरमाधुर्य ज्यांत आहे त्या काव्यापेक्षां केवळ अर्थसौंदर्यानें भरलेलें काव्य वरच्या पदवीचें. आणि त्याच्यापेक्षां फार वरच्या पदवीचें काव्य ध्वनिपूर्ण काव्य होय. प्रमाणशीरपणें तीनही गुणांनीं भरलेलें काव्य सर्वांत उत्कृष्ट काव्य होय हें सांगणें नकोच.

## ३

## काव्यविषय.

येथपर्यंत सामान्यतः काव्याच्या घटकावयवांबद्दल झालें. आतां काव्याच्या विषयांबद्दल विचार करूं. काव्याला अमूकच विषय

योग्य आणि अमूक अयोग्य हें म्हणणें अगदीं वृथा आहे. कवीच्या हृदयांत कल्पनातरंग उठवून त्याच्या मुखांतून नादवती, अर्थवती व ध्वनिवती वाणी जो प्रसवील तो विषय काव्याला सर्वथा योग्यच होय. शास्त्रज्ञान वाढत चाललें म्हणजे कवित्वाचा ऱ्हास होतो हें मेकॉलेचें प्रमेय सर्वथा त्याज्य आहे. शास्त्रज्ञान आणि तत्त्वज्ञान हीं दोनही कवित्वाचा उत्कर्ष होण्याला कधींही विघ्नरूप होणें शक्य नाहीं. मात्र वाटेल तो विषय घेऊन त्यावर काव्यरचना झाली पाहिजे. ज्ञानेश्वरी हें काव्य तत्त्वज्ञानाच्या विशदीकरणाकरितांच निर्माण झालें. परंतु त्यांत कवीच्या प्रतिभेचा पूर्ण उन्मेषच दिसून येतो. तेव्हां कोणत्या विषयाच्या योगानें कवीची वाणी काव्यामृत प्रसवूं लागेल आणि कोणच्या नाहीं, हें सांगणें फार कठीण आहे. ज्याप्रमाणें जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं चिन्मयता भरलेली आहे— चिन्मयतेचा प्रत्यय ज्याला येईल तो तत्त्वज्ञ—त्याचप्रमाणें जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं काव्य भरलेलें आहे,—त्या काव्यामुळें ज्याच्या हृदयांत स्फूर्तिसंचार होऊन त्या काव्याचें नाद, अर्थ व ध्वनि या त्रिगुणांनीं युक्त असें शब्दप्रतिबिंब त्याच्या मुखांतून बाहेर पडेल तो कवि. गोचिड आणि बेडुक हे काय कवितेला योग्य विषय आहेत ?—असा प्रश्न सामान्य लोक करितील; किंबहुना या प्राण्यांवर किंवा अशाच दुसऱ्या विषयांवर एखाद्या नवकवीनें काव्य लिहिलें तर जुन्या कवींचे दुराग्रही कैवारी त्याच्यावर भयंकर भडिमार करितील. परंतु या दोन क्षुद्र व गलिच्छ प्राण्यांवर ज्ञानेश्वरांनीं अजरामर असें काव्य लिहिलें आहे हें त्यांनीं विसरूं नये.

पाहें दूध पवित्र आणि गोड । पासीं त्वचेचिया पदराआड ॥
परि तें अव्हेरूनि गोचिड । अशुद्ध काइ नेघती ॥
कां कमलकंदा आणि दर्दुरीं । नांदणूक तरी एकीचि घरीं ॥
परि पराग सेविजे भ्रमरीं । जवळिला चिखलचि उरे ॥

गलिच्छ प्राण्यांच्या गलिच्छ संवयींचा प्रत्येकाच्या नजरेस पडणारा प्रकार ध्यानांत घेऊन नादमधुर, अर्थसुंदर, व ध्वनिप्रचुर असें काव्य ज्ञानेश्वरांनीं निमार्ण केलें ! तुकाराममहाराजांनीं तर आपल्या तडाक्यांतून कोणचाच विषय जाऊं दिला नाहीं. भलत्याच गोष्टीवरून संतापून आपलें नुकसान करून घेऊं नये हें श्रोत्यांच्या मनावर ठसविण्यासाठीं उवा पिसांचीही मदत आपल्या काव्यांत घेण्यास त्यांनीं बिलकुल संकोच केला नाहीं. एक अभंग सहज आठवतो आहे तो देतोः—

**तेलिणीशीं रुसला वेडा । कोरडि भाकर खातो भिडा ॥**
**नाडिलें लोकां टाकिला गोहो । बोडिलें डोकें सांडिला मोहो ॥**
**शेजारणीच्या गेली रागें । कुतऱ्यांनीं घर भरिलें मागें ॥**
**पिसारागें भाजिलें घर । नागविलें तें नेणे फार ॥**
**तुका म्हणे वांच्या रागें । फेडिलें सावलें देखिलें जगें ॥**

विषयांच्या भिन्नत्वाप्रमाणें किंवा रचनेच्या पद्धतीप्रमाणें काव्यांचे विविध प्रकार कल्पितां येतील, आणि तज्ज्ञांनीं तसे शेंकडो प्रकार कल्पिले आहेत. काव्यांचें एक शास्त्रच बनवून त्यांच्या व्याख्या, त्यांचीं लक्षणें, त्यांतील अलंकार, त्यांतील चमत्कार हीं सारीं कशीं असावींत, कां असावींत, याबद्दल गाढ व गूढ विवेचनें केलीं आहेत. त्या सर्वांचा विचार स्थलाभावामुळें येथें करणें अशक्य, व अप्रस्तुतही होईल. तेव्हां हें प्रकरण येथेंच ठेवून मोगरे यांच्या काव्यांचा विचार वरील स्थूल दृष्टीनें करूं.

## ४

## मोगरे यांची कविता.

वर सांगितलेंच आहे कीं, जसें लोकचरित त्रैगुण्योद्भव तसेंच काव्यही वरील विवेचनांत सांगितल्याप्रमाणें त्रैगुण्योद्भव आहे.

नाद, अर्थ व ध्वनि हें गुणत्रय काव्याच्या उद्भवाचें कारण. मोगरे यांच्या काव्यांत या तीनही गुणांचें अस्तित्व सहृदय वाचकांच्या प्रत्ययास किती किती अंशानें येतें तें पाहूं. शब्दरचना नादवती आहे कीं नाहीं, हा पहिला प्रश्न. आणि या प्रश्नाचें उत्तर अत्यंत उत्सुकतेनें कोणीही अस्तिपक्षींच देईल. शब्दरचना नादवती पाहिजे याचें खरें कारण असें आहे. एका मार्मिक ग्रंथकारानें म्हटलें आहे: "छापखाना अस्तित्वांत आल्यापासून जर कोणची एखादी मानवी शक्ति अगदीं लुली पडली असेल, तर ती मनुष्यांची काव्यरसज्ञताशक्ति होय." हें किती तथ्यपूर्ण आहे! कारण काव्यांचीं पुस्तकें छापून आयतीं हातांत मिळतात. तीं मुकाट्यानें आपल्याशींच ओळींवरून डोळे फिरवून वाचल्यानें काव्याचें सर्वांगीण सौंदर्य तितकें ध्यानांत येणें शक्य नाहीं. त्याचें मुखावाटे पठण होऊन कानावाटे ग्रहण झालें तरच त्याचें शब्दसौंदर्य यथोचितपणें आपल्यास समजणार आहे. वाल्मीकि ऋषींचें रामायण—ज्याला आदिकाव्य म्हणून सर्वत्र अगदीं योग्य मान आहे, तें—गाऊनच दाखविलें जात असे; तीच व्यवस्था सर्व काव्यांच्या संबंधांत झाली पाहिजे—काव्याचा प्रवेश आपल्या हृदयांत नेत्रांवाटे न होतां कर्णावाटे झाला पाहिजे. काव्य श्रवणीं पडतांच त्यांतील शब्दरचनेच्या नादानें कर्ण लुब्ध झाले कीं अर्थासाठीं हृदय आपोआप उत्सुक होतें. मोगरे यांचीं काव्यें याप्रमाणें वाचलीं असतां त्यांच्या शब्दरचनेच्या नादाचा नाद लागतो व वाचक नदीच्या संथ प्रवाहांत सांपडलेल्या नौकेप्रमाणें वाहत जातो. त्यांची 'अभिनव कादंबरी,' 'बुद्धजन्म,' 'जगदेवचरित्र' हीं काव्यें वाचून—मोठ्यानें वाचून—पाहावीं, म्हणजे मीं केलेल्या विधानाच्या सत्यपणाची प्रतीति वाचकांस येईल. त्यांची शब्दरचना फार नाद-

वती असते. तशीच ती अर्थवतीही असते, हेंही विशेष प्रकारानें सांगितलें पाहिजे असें नाहीं. परंतु ध्वनियुक्तता हा जो काव्याचा श्रेष्ठ गुण तो मात्र ज्या मानानें असावा त्या मानानें नाहीं, असें म्हणणें भाग आहे. ते कथानिरूपणांत फार कुशल, त्यांचीं शोकविषयक काव्येंही फार चांगलीं हृदयद्रावक. त्यांच्या काव्यांत प्रसाद फार आहे. कविता वाचतांच अर्थ झट्कन् ध्यानांत येऊन वाचणाराचें मन प्रसन्न होतें. शब्दांची निवड फार चांगली असते, आणि अर्थही सुंदर, सरळ व साधा असतो. परंतु रसिकांनींच ग्राह्य असा सूचितार्थ—ध्वनि—थोडा. शब्दांची रचना कित्येक वेळां इतकी साधी असते कीं कित्येकांस त्यांची कविता म्हणजे ‘ पद्यबद्ध गद्य ’ असें म्हणण्याचा मोह उत्पन्न होतो. कित्येकांनीं तसे उद्गार काढलेले ऐकलेही आहेत. परंतु असें म्हणणें नुसती अतिशयोक्ति आहे. हाच आरोप अलेक्झांडर पोपवरही केला गेला आहे. हा आरोप त्याच्यावर प्रथम कूपर कवीनें केला आणि त्याची री पुष्कळ टीकाकारांनीं ओढली. परंतु पोपच्या संबंधानें जसा तो आरोप मिथ्या आहे, तसाच मोगऱ्यांच्या संबंधानेंही मिथ्याच आहे. हा आरोप करण्याला कारण त्यांच्या काव्यांतील शब्दरचना अत्यंत सरळ व साधी आहे हेंच होय. परंतु माझ्या मतें हा तर त्यांच्या काव्याचा प्रधान गुण आहे. प्रसन्न पदलालित्य आणि प्रसन्न अर्थलालित्य या दोन गुणांनीच त्यांचीं काव्यें वाचकांच्या मनाला आकर्षण करून घेतात. या अल्पशा प्रस्तावनेंत उतारे देऊन माझें म्हणणें सिद्ध करणें शक्य नाहीं. परंतु वर निर्दिष्ट केलेलीं त्यांचीं काव्यें वाचून पाहणारास माझ्या म्हणण्याची प्रतीति तेव्हांच येईल. त्यांच्या बहुतेक काव्यांत शब्दरचना पडली आहे ती संभाषणांत योजिल्या जाणाऱ्या शब्दरचनेसारखी आहे, याही

एका कारणास्तव त्यांच्या काव्यांना 'पद्यबद्ध गद्य' म्हणण्याचा मोह कित्येकांस पडला असावा. पोपच्या काव्यांवर हा आक्षेप घेण्यासही तेंच कारण झालें. त्याचीही शब्दरचना संभाषणात्मकच विशेष. परंतु गद्य म्हणजे काय, पद्य म्हणजे काय, काव्याला गद्य पद्य हा निर्बंध आवश्यक आहे कीं काय, या प्रश्नांचीं उत्तरें देण्यांत काळ व स्थळ खर्ची घालण्यांत तात्पर्य नाहीं. मोगरे यांच्या काव्यगुणां-विषयींचें सामान्य विवेचन संपविण्यापूर्वी आणखी एक दोन गोष्टी येथें नमूद करण्यास कांहीं हरकत नाहीं. मोगरे यांच्या काव्यांत गरुड-भराऱ्या व चंडोल-लकेऱ्या नाहींत, भ्रमरगुंजारव आणि कोकिलकूजितें आहेत. क्रोध व तिरस्कार यांच्या आविर्भावाच्या शब्दांत सुद्धां संतप्त भ्रमराचा गुंजारव किंवा क्रुद्ध कोकिलेचें कूजि-तच ऐकूं येतें. शेले वगैरे कवींच्या काव्यांतून असणाऱ्या कल्पना-तीत कल्पनांच्या भराऱ्या या काव्यांतून नाहींत; किंवा ब्राउनिंग-सारख्यांच्या कवितांत असणारे गाढ व गूढ विचारही नाहींत. अथवा मानवी मनाचें व मनोविकारांचें पृथक्करण आणि विकास-दर्शन हींही नाहींत. इंग्रजी कवींमध्यें पोपचे बरेच व टेनिसनचे कित्येक गुण मोगरे यांच्या काव्यांत आढळतात. शब्दरचनेची साफसफाई व अर्थाची विशदता हे दोन गुण या दोन कवींच्या कवितांप्रमाणेंच मोगऱ्यांच्या काव्यांत दृष्टीस पडतात. त्यांच्या काव्यांत प्रसाद फार. शब्दांची व अर्थाची स्फटिकनिर्मलता म्हणजेच प्रसाद. तो गुण वाचकांचें मन प्रसन्न करून सोडतो.

५

## गुच्छ तिसरा.

आतां आपण प्रस्तुत गुच्छाकडे वळूं. प्रस्तुत गुच्छांत तीन प्रकरणें आहेत; तीं तीनही ज्याला इंग्रजींत *Satire* म्हणतात त्या

वर्गांतलीं काव्यें आहेत. या *Satire* शब्दानें व्यक्त होणारा अर्थ ज्यानें अगदीं तंतोतंत व्यक्त होईल असा संस्कृत अलंकारशास्त्रांत शोधाविचाराअंतींही मला अद्यापि शब्द सांपडला नाहीं. अलंकारशास्त्रांत जे Satire शब्दाच्या समान अर्थाचे शब्द आहेत ते 'वक्रोक्ति' आणि 'व्याजोक्ति' हे होत. परंतु त्या शब्दांत Satire शब्दाचा अर्थ तंतोतंत येत नाहीं. म्हणून त्या पारिभाषिक शब्दांचा उपयोग मी करीत नाहीं. Satire शब्दाची व्याख्या इंग्रजी ग्रंथांतून दिली आहे ती अशी:—

"A species of composition, originally a descriptive variety of didactic poetry, but in modern literature either poetry or prose, in which vice, folly, incapacity or corruption is held up to ridicule."

Satire लिहिण्यांत ज्याची कुशलता फार वर्णनीय असा लौकिक आहे तो ड्रायडन कवि या काव्याच्या हेतूंबद्दल म्हणतो:--

*The boldest way if not the best,*
*To tell men freely of their foulest faults,*
*To laugh at their vain deeds and vainer thoughts.*

आणि पोपनें तर असा बाणाच मारला आहे:—

*Yes ! I am proud—I must be proud to see*
*Men not afraid of God, afraid of me.*
*Safe from the bar, the pulpit and the throne.*
*Yet touched and shamed by ridicule alone.*

ही पोपची दर्पोक्ति कितपत तथ्यपूर्ण होती याचें विवेचन येथें करण्याची आवश्यकता नाहीं. तींत अहंताजनित अतिशयोक्ति आहे हें उघड आहे. शिवाय या उपहासकलेचा त्यानें खाजगी सूड उगविण्याकरितांही उपयोग केला. परंतु या प्रकारच्या

उपहासोक्तींचा उपयोग सद्धेतूनें करतां येणेंही शक्य आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. Satire या इंग्रजी शब्दांतल्या अर्थाचें तंतोतंत निदर्शन ज्यांत होईल असा संस्कृत साहित्यशास्त्रांत पारिभाषिक शब्द नाहीं. निदान पुष्कळ शोधाविचाराअंतीं मला तरी सांपडला नाहीं हें मीं सांगितलें आहेच. मी त्याच्यासाठीं नवीन सोपा पारिभाषिक शब्द योजितों आहें तो 'उपहासोक्ति' हा होय. ज्याला उद्देशून या अलंकाराचा उपयोग केलेला असेल, त्याला त्यापासून दुःख न होतां–निदान विशेष दुःख न होतां–इतरांप्रमाणें हंसूंच येईल अशा तऱ्हेनें त्याचा उपयोग केला, तर सहृदयहृदयांला आनंदच होईल. आणि अशा काव्यांची गणना–आधीं सांगितलेल्या गुणांची जोड त्यांत असली तर–उत्तम काव्यांत करण्यास मुळींच हरकत नाहीं. प्रस्तुत गुच्छांतल्या तीनही प्रकरणांत अशाच प्रकारच्या उपहासोक्ति अलंकाराचा उपयोग केला आहे. प्रत्येक प्रकरणाचें नुसतें नांव पाहिलें तरी त्यांत कांहीं तरी उपहास आहे असें मनांत आल्याखेरीज राहणारच नाहीं. तीं नांवें अशीं:——

**१ पदवीचा पाडवा,**
**२ मेथाजींची मजलस,**
**३ अभिनव धर्मस्थापना.**

पहिल्या प्रकरणांत पदवीसाठीं हपापलेल्या लोकांचें उपहासचित्र आहे. दुसऱ्यांत सुरतेस झालेल्या कांग्रेसमधील बखेड्याचें आदिकारण जे "टवाळ सेनानी" त्यांच्या उक्तीच्या रूपानें राष्ट्रीय ऊर्फ जहाल पक्षाचा उपहास केला आहे. तिसऱ्यांत, सनातनधर्माभिमानी म्हणविणाऱ्या लोकांच्या उक्तीच्या रूपानें सुधारकांची नादान स्थिति वर्णन करून, नवीन धर्मस्थापना झाल्यानें काय होणार याचें उपहासचित्र काढलें आहे. हीं तीनही प्रकरणें फार

सुंदर आहेत. अमेरिकेंतील प्रसिद्ध वाङ्मयोपासक लुएल यानें Satire चे दोन विभाग केले आहेत. ते Intellectual Satire–बौद्धिक उपहासोक्ति व Imaginative Satire–भावनिक उपहासोक्ति असे आहेत. त्यांपैकीं Imaginative Satire या सदराखालीं प्रस्तुतचीं प्रकरणें येतील. Lowell चें म्हणणें, या दुसऱ्या विभागांत उपहास्य विषयाशीं कवीची सहानुभूति असते तशी पहिल्या विभागांत नसते. दुसऱ्या तऱ्हेच्या उपहासोक्तींत कवीच्या उपहासोक्तीपासून उपहास्य व्यक्तीला मर्मभेदक दुःख होत नाहीं, कवि आणि ती व्यक्ति दोघेही त्यापासून मौज करून घेऊन एकमेकांबरोबर हंसतात. तो उपहास खरा, परंतु त्याला परिहासाचें रूप येतें. सार्वजनीन दोषांचा, व्यसनांचा, अवगुणांचा उपहास कितीही कठोर, कितीही निष्करुण शब्दांनीं केलेला असला तरी तो सह्य असतो. कारण तो जातिविषयक असतो, व्यक्तिविषयक नसतो. व्यक्तीवरून सुचलेला असला तरी सत्कवि त्याचें वैय्यक्तिक स्वरूप काढून टाकून त्याला जातिविषयक स्वरूप देतो. तसें स्वरूप या तीनही प्रकरणांत मोगरे यांनीं दिलेलें आहे. आणि म्हणून त्यापासून आल्हाद होतो, गंमत वाटते, आणि कोणाचेंही मन न दुखतां बोध केला जातो व घेतलाही जातो. या दृष्टीनें हीं मोगरे यांचीं उपहासात्मक काव्यें वाचलीं तर त्यांपासून सर्वांच्या मनास आल्हाद होईल व निर्मिश्र अशा हास्याच्या उकळ्यांवर उकळ्या फुटतील.याचा प्रत्यय घेऊन पाहावा.

मोगरे यांच्या या व इतर कवितांवरून ते फार विनोदी होते, त्यांचें निरीक्षण सूक्ष्म होतें, त्यांचें मराठी भाषेवर चांगलें प्रभुत्व होतें, त्यांची शब्दरचना मधुर, उचित व ललित त्याचप्रमाणें त्यांची विषयांची निवड मार्मिक अशी असे, हें सर्व स्पष्ट दिसून येतें.

त्यांचा देशाभिमान व भाषाभिमान उज्ज्वल असे. कवितेवरील त्यांचें प्रेम आत्यंतिक. त्यांनीं आपल्या कन्यादान या लहानशा काव्यांत सामान्यतः कवितेविषयीं काढलेल्या उद्गारांनींच त्यांची ही कृति रसिक वाचकांस अर्पण करितों.

मानावस्तु जगीं रसाळ दुसऱ्या आहेत राया तरी
सर्वांहून हिचीच फार रसिकीं वाखाणिली माधुरी ।
येतो वीट विशेष पान करितां अन्यां रसांचें जना
जावें सेवित हीस तों अधिकची उल्हास वाटे मना ॥

हरि नारायण आपटे.

# शुद्धिपत्र.

| पृ. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५ | ४ | कदाचित | कदाचित् |
| १३ | १८ | वार्तेचाही | वार्तेचाहि |
| ,, | १९ | परंतू | परंतु |
| १६ | ७ | कांढणांर | काढणार |
| २६ | ४ | त्यांतही | त्यांतहि |
| २७ | २ | खरखुरा | खराखुरा |
| ३४ | ६ | मजला | सजला |
| ३९ | १३ | पथवीधर | पदवीधर— |
| ५५ | २० | धुळींत | धूळींत |
| ६१ | २० | बाम्हण | ब्राह्मण |
| ७२ | १८ | अशरिणि परंतु बदली | अशरीरिणी परि वदे |
| ८२ | १२ | निस्पृहता | निःस्पृहता |
| ८५ | १५ | विालयतेला | विलायतेला |

# मोगऱ्याचीं फुलें.

## गुच्छ ३.

### १. " पदवीचा पाडवा. "

जों जों येई जवळी पहिली तारिख नवीन वर्षाची,
तों तों अधिकची उसळे उकळी माझ्या मनांत हर्षाची. १

माझी बहु दिवसांची आतां संपूर्ण आस होणार;
सिद्धीस दैव माझें माझ्या यत्नांस खास नेणार. २

पदवी नवरी द्याया ह्या नवरोजीस भेट येणार;
**रावबहादुर** म्हणवुनि हक्कानें मी जगांत घेणार. ३

हा ! हा ! कधीं तरी हा उगवावा चांगला असा दिवस,
म्हणुनी करीत होती गृहिणीही आमची किती नवस. ४

बारा महिने धरुनी **देवी**चे पाय लाडकी बसली;
तेव्हां हंसतां कोठें **अंबा** ती एकदां तिला दिसली. ५

गांठ तयींच मनाची सुटली, शंका समग्रही फिटली;
'फत्ते' ह्मणूनि टाळी आनंदाच्या भरांत म्यां पिटिली. ६

करवुनि माझ्याकरवीं रुद्र महारुद्र धान्यधन-दानें,
ग्रहही उच्चस्थानीं सर्व बसविले भुजंग जोशानें. ७

होती घरांत सांगत **बं**डुभटाचीहि बायको काल—
कीं मी स्वप्नीं दिसलों पांघरतां तीस भरजरी शाल. ८
लावूनि कौल परवां घरच्या देवास **गुं**डभट आला;
तों उजवीच सुपारी शंभरदां देव देतसे त्याला. ९
"एजंट" काल माझा आला सारा तपास काढून;
हांसत तोहि म्हणाला " आहे कम्प्लीट ताट वाढून !" १०
शेजारिणही परवां बोलुनि ती जाय **मा**णकूबाई—
कीं बातमी तिला दे हीच तिचा **धों**डभट्ट जांवाई. ११
**न**रसोपंत **घ**मंडे कालच मुद्दाम भेट देऊन
गुज मज हेंच कळविती एकांतीं कोपऱ्यांत नेऊन. १२
" आहे खिशांत माझ्या सर्व पुरावा " असें म्हणुनि जातां
मज दाखवावया तो, लागे त्यांच्या न कागदचि हाता. १३
पडला असेल कोठें; चित्त ठिकाणावरी कधीं नसलें
ह्मणजे नित्य मनुष्याकडुनी होती प्रकार हे असले. १४
कोणी म्हणो घमंडानंदन त्या आमच्या **घ**मंडयाला,
अवलोकनांत माझ्या तोच परी एक शाहणा आला. १५
नसतें असें तरी त्या **ला**टाचें पत्र त्यास कां येतें ?
विद्वत्तेची त्याच्या साक्ष पुरोपूर गोष्ट ही देते. १६
**रा**वबहादुर म्हणुनी **न**टसाहेबहि करी मज सलाम,
फत्ते म्हणून वाटे झालें असलेंच पाहिजे काम. १७

आहे सर्व तयारी, ग्याझेटाचीच काय ती खोटी;
वाट पहात तयाची युगसम पळ एक एक मी लोटीं. १८
दिवस न कां हा जाई? इतका कां सूर्य आळशी झाला?
किंवा माझ्या कोणा वैऱ्यानें भीड घातली त्याला? १९
हा मावळे न तों ती रात्र पुढें येउनी उभी आहे!
बारा तास इथें कां रखडत सटवी कळे न ती राहे!! २०
पुढची सर्व तयारी झाली असुनी विलंब हा जितका
कारण नसतां होतो, माझा संताप वाढतो तितका. २१
घरही तऱ्हेतऱ्हेचा रंगविलें देउनी नवा रंग;
होतात लोक सारे पाहुनि माझ्या घराकडे दंग. २२
हें तों काय? उद्यां मी करुनी जो दाखवीन तो थाट
बघुनि म्हणाल—'कधींही झाला नव्हता असा लखलखाट!' २३
आहे दिवाणखाना, सांगायाचाच काय तो अवधी;
न करी नकार कोणा मागूं जातां **खुशाल**शेट कधीं. २४
जागा इथें पुरेशी नाहीं ह्मणुनी तिथेंच घ्या मुजरा—
म्हणुनी सांगून गेल्या **कृ**ष्णी **चं**द्री **स**रस्वती **ग**जरा. २५
आहे ठीक, तिथेंही आपण करणार सर्व आरास;
म्यां शेटजींस द्यावा माझ्याकरितां उगाच कां त्रास? २६
आणीन आग्रहानें बोलावुनि मी बडीं बडीं धेंडें—
म्हणुनी मुलांस सांगुनि गेले आहेत **रा**वजी **शें**डे. २७

माझ्या सदरेमध्यें इतके बसतील लोक ते कोठें ?
घ्यावें पडेल म्हणुनी शेटीचें "हाल" तें मला मोठें. २८
सांगुनि **म**ल्हारीला **इंकणिसा**चा* नवीन " लैट " असा
करुनी दाखवितों कीं, कोणीही पाहिला नसेल तसा. २९
साहेब मोठमोठे तेथें येतील **बं**डुनानाचे,
पाहील तोंच तिकडे–कीं न तसा नाचरा दुजा नाचे. ३०
स्वांगें **खु**शालशेटचि अध्यक्षस्थान शोभवीणार,
" स्पीच " तयार कराया म्हणुनी श्रम तो करीतसे फार. ३१
**नट** साहेब म्हणाला–**पा**लनजीलाच सांगुनी करवा
खाना तयार, म्हणुनी त्याचीही भेट घेतली परवां. ३२
सोनेरी शाईनें आमंत्रणपत्रिकाहि सात शतें
छापवुनी आणाया गेले आहेत **गुं**डपाठक ते. ३३
संथा घेत अहर्निश बसुनी घोकीत राहिलों आहें,
बिनूचूक पाठ म्हणुनी भाषण माझेंहि होउनी राहे. ३४
अध्यक्षांचें माझें तैशीं दुसरींहि भाषणें फार
होउनि, दैनिकपत्रीं तीं साद्यंत प्रसिद्ध होणार. ३५
खटपट सर्व **घ**मंडे करिती भेटुनि रिपोर्टरांनाही;
घेई साह्य न त्यांचें ऐसा म्हणतात 'एडिटर' नाहीं. ३६
हार-तुरे-गजऱ्यांच्या आणा म्हणतांच आणितों पाव्या–
म्हणुनी सांगुन गेला माळीही तो मघांच **को**काव्या. ३७

* Incande scent.

अत्तरगुलाबदान्या भरवुनि आहेत नीट ठेवविल्या;
शेटीकडे सकाळीं आधीं त्या पाहिजेत पाठविल्या. ३८
काय परंतु तयाच्या सदनीं त्यांची असेल कमताई ?
रागावेल कदाचित; आपण इतकी करूं नये घाई. ३९
'श्रीसत्यदेवपूजा पहिल्या दिवशींच पाहिजे झाली'—
सांगीतलें घरांतुनि; माझ्याही गोष्ट ती मना आली. ४०
मोठ्या थाटानें ती पूजा माझी अवश्य होणार,
आणी म्हणुनि रुपेरी चौरंगहि बाळशेट सोनार. ४१
आहे नटावयाची ऐशा वेळीं उदंड हौस तिला;
शालू अडीचशेंचा चंदेरीहुनि म्हणून आणविला. ४२
होती खानबहादुर रावबहादुर महामहोपाध्ये;
त्यांच्या दारीं न तरी वाजावीं तीं कुठें तरी वाद्यें ? ४३
म्हणुनी गुंडोबानें तो गणपतराव चौघडेवाला
ठरवुनि, काल सुपारी आहे देऊनि ठेविली त्याला. ४४
'ब्यांड' असावा ऐशी इच्छा आहे तिच्या मनीं फार;
न म्हणे कोण ? अशानें खर्चाचा काय वाढतो भार ? ४५
लौकिक मात्र मिळो, मग खर्चाची त्या मला नसे परवा;
रुपये हजार देउनि म्यां तो चौरंग घेतला परवां. ४६
'दरवाजा उघडा रे ! वाटे आला असे कुणी द्वारीं;'
तों गुंडपाठकाची येउनि राहे पुढें उभी स्वारी. ४७

**गुं**डोपंत म्हणालेः पदवी यंदां कुणासही नाहीं—
आतांच सांगुनि असें गेले तुमचे मला नवे व्याही. ४८
आहे **विलायते**हुनि येउनि नुकतीच धडकली तार—
कीं बंद पाडण्याचें आतां पदवीप्रदान होणार. ५९
गडबड फार उडाली आहे सगळ्या म्हणूनि शहरांत;
आनंदाच्या म्हणती विरजण पडलें कुठोनि बहरांत ! ५०
पुरता शोध कराया मीहि **घमंड्यां**कडे स्वयें जाय;
तेहि म्हणाले—'माझे वाचुनि ती तार मोडले पाय ! ५१
सांगा यजमानांना झाली ती गोष्ट होउनी गेली;
तुमची काय, निराशा सर्वांचीही नरेश्वरें केली. ५२
व्यूह बरोबर रचिला होता बांधूनि सर्वही नाकें;
होणार कार्य, तों हें संकट मध्येंच येउनी ठाके. ५३
नाकें दुस्मानांचीं ह्यानें उंचावतील मी जाणें;
आणील शेवटीं हा धीर धरा प्रत्यया खरें नाणें. ५४
चुकला कारण नसतां दुर्दैवानेंच आज हा बाण;
न चुकेल तो पुन्हां हें म्हणतों मी सत्य वाहुनी आण. ५५
चुकला कसला ? त्याचा मागसला कार्यभागची आज,
म्हणुनी प्रताप त्याचा दाखविण्याचें मला नुरे काज. ५६

❀ ❀ ❀ ❀ ❀

रव हे **गुं**डभटाचे हृदयाला झोंबले जसे व्याळ;
**भो**लानाथ म्हणे—"हा कोठुनि संप्राप्त जाहला काळ ! ५७

काळें तोंड करोनी कां नाहीं जाउनी घरीं बसला ?
व्यापार हा कराया ह्याला सांगीतला कुणी असला ? ५८
जाउनि कां हा तिकडे मेल्याची खबर घेउनी आला ?
दुर्योधन तो नरशा, बंड्या शकुनी भला मिळे त्याला ! ५९
दुःशासन हा तिसरा गुंड्या,–ही सारखी त्रयी मिळुनी
हा धर्मराज भोलानाथ इहीं साफ टाकिला पिळुनी. ६०
सावध करीत होते मज समजुनि मूर्ख, मी तयां हंसलों;
ह्या मूर्खांच्या नादीं लागुनि आतां कळे मला फसलों. ६१
पदवी कसली आहे ? हें सारें बंड बंडुनानाचें;
तो नाचवी तसा हा भोलानाथहि न शंकतां नाचे. ६२
कळला आज घमंडानदंन आहे खरा घमंड्या तो;
वर्षें पांच अशा ह्या थापा देवोनियां मला जातो. ६३
फिरुनि घरोघर ह्याच्या नादें मी नित्य फाडिले जोडे;
गाड्या गल्लोगल्लीं हिंडवुनी व्यर्थ मारिले घोडे. ६४
ह्याच्याच संगतीनें भरली माझ्या मनांत ही हूर;
केला व्यर्थ हजारों रुपयांचा लोकरंजनीं चूर. ६५
साहेब आज अमका, तमका सरदार तो उद्यां आला;
केली तयार गाडी, गेलों मुजरा करावया त्याला ! ६६
यत्नें कसाबसा तरि त्यांच्या हातास लावुनी हात
माझ्या मुखेंच माझी बसलों मी नित्य थोरवी गात. ६७

नाचतमाशे करवीं परिचय त्यांचा करूनि घ्याया मी;
वर्षें पांच दिवाळी माझ्या ही नित्य चालली धामीं. ६८
पूजा आज, उद्यां हरिकीर्तन, तों जेवणावळहि परवां;
खाना खाउनि उठले लोक न तों नाच बैठकी करवा. ६९
भरवा सभा, समर्पण अमक्यातमक्यास मानपत्र करा;
कीं लोकमान्य व्हाया मार्ग नसे चांगला तसा दुसरा. ७०
लग्न असो मुंज असो हळदीकुंकू असो कधीं झालें,
छापूनि वृत्त माझ्या घरचें तें वृत्तपत्रकीं आलें. ७१
रडलें घरांत पडलें मूल कुठें, बायको कधीं रुसली,
कुशल पुसाया येउनि शेजारिण **माणकू** जरी बसली, ७२
वृत्तांत तो सविस्तर पत्रीं म्यां छापवूनि आणविला;
माझ्या श्रीमंतीचा महिमा साऱ्या जगास जाणविला. ७३
श्रीमंतींत अशा ह्या पदवीची भर पडेल त्या जेव्हां,
साखर दुधांत पडली ऐसा होणार योग तो तेव्हां. ७४
साखर कसली हा ! हा ! **गुंड्या** हा आज सर्व लोकांत
माझें हंसें कराया आंबट लिंबू पिळीतसे त्यांत. ७५
काय करूं मी देवा ! तोंड तरी दाखवूं कसें लोकां !
हा आज लौकिकाला माझ्या बसला किती तरी धोका ! ७६
हंसतील आप्त, झाला वैरी म्हणतील सर्व हेतु पुरा;
जो तो म्हणेल पाहुनि मज—'हा आला उतावळा नवरा !' ७७

येतिल परवां नाचत **कृष्ण्या चंद्र्या सरस्वत्या**, त्यांना
सांगूं काय जयीं त्या मुजरा म्हणतील आज कां ध्याना ? ७८
कळवावया जनांना माझी फजितीच काय ही सारी—
धडधडणार उद्यां तो माझ्या येऊनि चौघडा दारीं ! ७९
सूर्य न अस्ता जाई तोंच उद्यां माझियापुढें रास
हार-तुरे-गजऱ्यांची **को**काव्याही करील तो खास. ८०
भरल्या अत्तरदान्या पडल्या त्या सर्व जागच्या जागीं !
हर हर ! मजसम दुसरा कोण जगीं ह्या असेल हतभागी ! ८१
द्या रे पक्वान्नांचे सर्व भिकाऱ्यांस वांटुनी हारे !
झालें ब्राह्मणभोजन ! जेवविले इष्टमित्रही सारे ! ८२
जा **गुं**डभट्ट ! तुमचें आतां मज राहिलें नसे काज !
आशीर्वाद पुरोपुर तुमचे आले फळा मला आज ! ८३
पूजा अर्चा तुमच्या तुमच्या पोथींत बांधुनी ठेवा !
हा शेवटील तुमच्या आज नमस्कार आमचा देवा ! ८४
सांगा **बं**डोबाला, त्याहि **घमं**ड्यास हेंच सांगा हो !
त्यांची कर्तबगारी त्यांच्यापाशींच सर्वदा राहो ! ८५
गप्पीदास तुम्ही हें आलें आतां पुरें कळोनि मला !
**भो**लानाथ भुलोनी तुमच्या बोलास हा वृथा भ्रमला ! ८६
जा जा ! **रावबहादुर** झालों मी ! हेतु सर्वही पुरले !
कांहीं करावयाचें आतां आम्हां तुम्हां नसे उरलें ! ८७

संग नको मज तुमचा ! तुमचे उपकार जाहले फार !
घ्या हा तुम्हांस, तुमच्या सांगा मित्रांसही नमस्कार !" ८८

* * * * *

होता स्वयें पुरोपुर यजमानांचा स्वभाव ओळखुनी,
लेशहि खिन्न न झाला **गुं**डोबा ह्या दुरुत्तरीं म्हणुनी. ८९
काढुनि डबी खिशांतुनि यजमानांच्या पुढें करूनि म्हणे:
" घ्या लाजवील माझी वल्ली ही **वर्तकी**सही स्वगुणें. ९०
देशी तंबाखूची केली म्यां ही सशास्त्र तपकीर;
ओढीत हीच होते **भी**ष्म**द्रो**णादि भारती वीर. ९१
संजीवनी **सु**षेणें पूर्वी **लं**केंत हीच आणविली;
वांचवुनी **सौ**मित्रा शक्ति हिची ह्या जगास दाखविली. ९२
पूड भिकार नव्हे ही, ती जी लोकांत नित्य वापरिती;
वेडे लोक खराबी मगजाची मात्र आपुल्या करिती. ९३
सामान्य ही न; जो ही सेवी देऊनियां सहस्र पुटें,
होईल सरळ त्याचें असलें जरि नाक मूळचें नकटें. ९४
माझा विचार आहे, बनवावी ती तशी सहस्रपुटी;
साठांत एकही परि लावाया मज तिथें मिळे न घटी. ९५
न तरी नकटीं नाकें सरळ क्षण लावितां न मी करुनी
पाश्चात्य वैद्यकाचें यश असतें सर्व घेतलें हरुनी. ९६
इकडे यजमानांचीं, तिकडे कामें हजार तीं दुसरीं;
म्हणुनी मागें पडल्या माझ्या आहेत ह्या कलाकुसरी. ९७

पाहूं विचार तो मग, ओढुनि तपकीर ही पहा आधीं;
आधिव्याधि हराया मगजाच्या हीच औषधी साधी. ९८
होईल थंड मस्तक, संतापज्वरहि शांत होईल,
औदासीन्य मनाला सोडुनि एका क्षणांत जाईल. ९९
आम्हांवर कां इतका रोष—असा दोष आमचा काय—
म्हणुनी अंतर आम्हां देऊं म्हणतात आज हे पाय ? १००
काय न केवळ, जीवित तुमच्या कार्यास वाहिलें ज्यांनीं,
बक्षीस हेंच घ्यावें असलें यजमान ! काय हो त्यांनीं ? १०१
तुमच्या हिताहिताशीं आहे संबंध आमचा जडला,
वर्षें पांच असे हा जन म्हणुनी खटपटींत ह्या पडला. २
संतत धार धरावी शंभुशिरीं म्यांच आपणाकरितां,
फुरसुत परी न; म्हणुनी मानसपूजाच होय हा करिता. ३
दृष्टीस देव पडला जो जो तो नवसिला न मीं काय ?
हे लागले न कोणा जोशाच्या पायरीस हो पाय ? ४
तांत्रिक मांत्रिक सारे सुचले मज ते उपाय म्यां केले;
प्रतिकूळ काळ आला केवळ म्हणुनीच ते वृथा गेले. १०५
मीहि तथापि, **घमंडे** म्हणती तैसेंच, वाहुनी आण
म्हणतों-'चुकला आजी न तसा पुढती चुकेल हा बाण !' ६
धीर असूं द्या चित्तीं; **गुंडोबा** हा म्हणा न सामान्य;
दैवानेंच तुम्हांला भिक्षुक हा लाधला असा मान्य. ७

घोका वेद कशाला ? शास्त्रेंही कां हवीं रडाया तीं ?
केवळ युक्तिबळें ह्या लोकीं पुरुशार्थ साधिले जाती. ८
वेदाक्षर मज न कळे, शास्त्रहि मज रोगिया जसें अन्न;
म्हणवुनि तथापि घेतों लोकीं मी वेदशास्त्रसंपन्न. ९
घोकून वेद कोणी म्हणती आम्हां म्हणा दशग्रंथी;
कोणी शास्त्री म्हणवी, कीं तो षट्शास्त्रसागरा मंथी. ११०
ग्रंथ नकोत मला ते; साह्य मला एक जातिसंस्कार,
युक्तींचें बळ दुसरें, तिसरा तुमचाहि थोर आधार. ११
साह्यें ह्याच तिघांच्या दिग्विजयाची धरोनियां हांव,
घाव निशाणीं देउनि म्हणतों मी ‘ मन्मनोरथा धांव !’ १२
चंचल नक्षत्रीं ह्या गुंड्याचें जाहलें असें जनन—
जोशी म्हणती यास्तव अस्थिर ह्याचें सदा असेल मन. १३
‘ न्या मुंबईस ह्याला, बाळ असे हा विशाल बुद्धीचा;
चालेल नीट धंदा तिकडे ह्याचा जगत्प्रसिद्धीचा.’ १४
पटली गोष्ट मनाला बाबांच्या ती; मलाहि उल्हास
आधींच, त्यांत आला बारावा तोहि आयता मास. ११५
आलों इथें, मिळाला आश्रय तुमचा, न काळजी उरली;
भिक्षुक बाबा बनले, रुचली मज ती दिशाहि म्यां धरिली. १६
सातां नवसांचें हें एकुलतें एक लाडकें बाळ,
उडण्याबागडण्यांतचि बाळपणीं घालवीतसे काळ. १७

शिकलों नाहीं कांहीं, वडिलांनींही शिकूं दिलें नाहीं;
म्हणुनी म्हणूं नका हा केवळ होवोनि टोणपा राही. १८
जात्याच हूड मी, मज त्यांतहि संस्कार पूर्ण जातीचा;
ज्ञानाच्या सहज पडे म्हणुनि मनीं ह्या उजेड वातीचा. १९
सर्व भराभार बसलीं पोथ्यांचीं ह्या जिभेवरी नांवें;
संस्काराविण पडलें विद्वत्तेचें गळ्यांतही दावें. १२०
लटपटपंची माझी सगळ्या विषयांत चालती झाली;
पदवी एकामागुनि एक मजकडे हळूहळू आली. २१
वैदिक आज, उद्यां तों शास्त्री, जोशी, भिषग्वरहि परवां
झालों सुखें; म्हणो मज कोणी कांहीं मला नसे परवा. २२
'फळ वासनेप्रमाणें देतो **श्रीवासुदेव** लोकांस,'—
ह्मणती सर्व; पुराणिक हेंच पुराणांत सांगतो **व्यास**. २३
प्रत्यय ह्या वचनाचा आहे मजला पदोपदीं आला:
जी वासना धरावी ती तो जगदीश पुरविता झाला. २४
इतकाच हेतु आतां, कीं त्या देवें महामहोपाध्या
करुनी ठेवावा हा भारतमार्तंड **गुंडभट पा**ध्या. १२५
झालों असतों यंदां; नव्हती त्याची मनास ह्या शंका;
होता जगांत साऱ्या त्या वार्तेचाही वाजला डंका. २६
चळला परंतू बहुधा म्हातारा तो प्रधान रायाचा,
म्हणुनी ह्या वर्षींही पूर्ण मनोरथ न जाहला याचा. २७

चळला नसता तरि तो, कां हो मोडूनि ही जुनी चाल
दुःखासवें कराया ओले आम्हांस लविता गाल? २८
यंदां बंदाचि झालें; चालू होतें परंतु तें जेव्हां,
पदवीप्रदान यावें माझ्या वांट्यास कां न हो तेव्हां? २९
नाहीं परंतु नाहीं कोणी लोकांत ह्या गुणग्राही!
**गुंडोबा** हा म्हणुनी पदवीवांचून आजवर राही! १३०
वेडावले जन, परी वेडें सरकार होय हो कां तें?
आश्चर्य—काय सांगूं—ह्याचें वाटे किती तरी मातें! ३१
माझ्या पराक्रमांची त्यांनीं यादी न पाहिली वाटे;
मध्येंच ती कुणाच्या अथवा निष्काळजीमुळें फाटे. ३२
ती फाटली खरोखर ह्याविषयीं राहिली नसे शंका;
वाजवितों स्वमुखें मी स्वगुणांचा म्हणुनि आज हा डंका! ३३
व्हावें कसें सनातनधर्माचें ह्या अशेष वाटोळें—
चित्तीं सुधारकांच्या उठतां बसतां विचार हा घोळे. ३४
साह्यें **मलबारी**च्या सरकाराचेंहि कान फुंकून,
होते पहात पहिल्या[1] संस्काराचा करावया खून. १३५
कुजबुजती न्हाणवल्या, ह्मातारे नवरदेवही भ्याले;
म्हणति अरिष्ट सनातनधर्मावर हाय! काय हें आलें! ३६
भ्याल्या आया बाया; म्हणती आतां हवा तसा जाच
करितील घोडनवऱ्या निर्भय निःशंक सासवांनाच. ३७

१. षोडश संस्कारांचा गर्भधानापासून आरंभ आहे.

देउनि धीर तयांना, **मा**धवबागेंत करुनियां मोड
ज्यांनीं सुधारकांचा, **मलबारी**चीहि मोडिली खोड, ३८
अग्रेसर मी होतों त्या गर्भाधानपंडितांमाजी!
युक्तिच कामा आली त्यावेळीं फार फार ती माझी. ३९
संस्कारहीन ज्यांना म्हणतों आह्मींच नित्य कंठरवें,
म्हणुनी घरीं न ज्यांच्या आम्हां वेदोक्तकर्महीं करवे, १४०
गोळा वाणी उदमी कोळी माळी करोनि ते सर्व
संस्कारधर्म रक्षीं प्रतिपक्षाचा हरोनि मी गर्व. ४१
'गडबडदान कशाचें भटजी?'-मज ते विचारिती जेव्हां,
हंसति सुधारक खो खो ! झांकीं मीही निजानना तेव्हां. ४२
झालें कार्य. पुसे त्या गडबडदानास कोण हो आतां?
गेले निघोनि ते, मी झालों माझ्या घराकडे जाता. ४३
धर्मावनार्थ म्यां हा केला नसता जरी खटाटोप,
होता खचित सनातनधर्माचा आज आपल्या लोप. ४४
व्हावा न, परी झाला सरकारांतूनि कायदा पास;
होणार तें चुकवितां माझ्या तुमच्याहि ये न बापास. १४५
इतकें परंतु आतां कळलें आहे सुधारकां स्पष्ट,
कीं हा देह असे तों नाहीं होणार धर्म हा नष्ट. ४६
असती बहुत सनातन-धर्ममहामंडळामधें तरणी;
केली परंतु सांगा मजसम कोणी कधीं अशी करणी? ४७

त्यांच्या अध्यक्षाचा त्यांनीं मज पाहिजे दिला मान;
हा एक **गुंडभटची** निःसंशय शोभवील तें स्थान. ४८
त्यांची तरी प्रतिष्ठा कोण फुका वाढवी परी इतकी ?
स्थापीन मंडळें मी इकडे तसलीं मला हवीं तितकीं ! ४९
आहे **गणेशमंडळ**, दुसरींहि काय मंडळें थोडीं ?
ढुङ्गाचार्या मजसम त्यांत परी काय लागते गोडी ! १५०
म्हणुनी नवेंच मंडळ आहें मी काढणार एक बडें,
पदवी देतां घेतां श्रम न पडावे कधीं कुणा जिकडे. ५१
तिकडे निर्मुनि पदव्या अखिलविशेषणविभूषणान्वित मी
'ग्याझेटी' पदव्यांचें करुनि पहा टाकितों महत्त्व कमी. ५२
उपलब्ध कोश सारे यास्तव साद्यंत नीट चाळून
सुंदर विशेषणें म्यां केलीं एकत्र सर्व गाळून. ५३
आहे तशीच ठेवा सर्व तयारी; तिचाच उपयोग
व्हावा असा घडवुनी सत्वर मी आणितों पहा योग. ५४
भीतां कशास ? माझीं चरितें जीं राहिलीं कथायाचीं
घ्या नीट ऐकुनी तीं ! शक्ति तुम्हांला कळेल मग याची !१५५
धर्माचाच न केवळ शास्त्रांचाही जनांस हो बोध,
म्हणुनी करीत असतों रात्रंदिन मी नवे नवे शोध. ५६
सुश्रुत चरकीं गाळुनि वाग्भट्टीमाजि देउनी आंच,
अश्रुत अपूर्व रसपरिपाक जना चाखवीतसे हाच. ५७

धन्वंतरीहि विस्मित ऐकुनि म्हणतात होय ही मात;
आयुर्वेदविदारक म्हणुनि मला सर्व लोक म्हणतात. १५८
आला पहिला जेव्हां प्लेगाचा **मुंबई**वरी घाला,
सर्वत्र त्या प्रसंगीं हाहाकार प्रवर्तता झाला ! ५९
कोणी वेडे म्हणती आहे शहरांत सांचली घाण,
उद्भवला म्हणुनी हा रोग जनांचे हरावया प्राण. १६०
वेडेच ते; तयांना शास्त्रांचें काय ठाउकें मर्म !
मारी घाण जनांना—काय तरी स्वस्थ बैसलें कर्म ? ६१
कोणी पंडित म्हणती: मेळ्यांचें काढुनी नवें बंड
आहे **पुणें**करांनीं माजविलें जें विचित्र पाखंड, ६२
तेणें **विघ्नविनायक** होउनियां क्रुद्ध मानसीं फार
निजमूषकसेनेला त्यांचा घ्या घ्या म्हणे समाचार ! ६३
‘ उंदिर मरती आधीं जेथें, तेथेंच माणसें मरती’;
तर्क विलक्षण असला ह्याला आधार ते पुढें करिती. ६४
अपराध माणसांचा असुनि करी देव मूषकां दंड,
हें म्हणणेंच पहातां शास्त्रमतें होय शुद्ध पाखंड. १६५
तर्क न हा, तर्कट हें!—किंवा माना सुधारकी चार;
साही शास्त्रीं कोठें नाहीं तिळमात्र ह्यास आधार. ६६
शास्त्री सर्व मिळवुनी केली आम्हीं विचारणा याची;
भवतिनभवती पुष्कळ होउनियां घेतलीं मतें त्यांचीं. ६७

'कारण सुधारकांचीं पापें आहेत ह्या अरिष्टाला'—
त्यांच्या सर्व मतांचा कळुनी सारांश हा तयीं आला. ६८
उपलब्ध स्मृति त्यांनीं आधीं चाळूनि पाहिल्या; त्यांत
आधार त्यांस न मिळे, म्हणुनि जरा तेहि जाहले भ्रांत. ६९
इतक्यांत युक्ति माझी सुचली मज, ती तयांसही रुचली;
अक्कल म्हणती ह्याच्या युक्तिपुढें सर्व आपली खचली ! १७०
"असलाच पाहिजे हो ह्याला नष्ट स्मृतींत आधार"—
इतकें मात्र म्हणालों तों झाली सर्व मंडळी गार ! ७१
म्हणति ' तथैव तथैव !' भ्रांति कुणाला न राहिली कांहीं;
जो तो म्हणे विचक्षण **गुंडोबा**सारखा जगीं नाहीं. ७२
ऐका ! पुढें जसजसा पसरत तो रोग चालला द्वाड,
भ्याले डॉक्टर वैद्यहि; इतरांचा काय हो तिथें पाड ? ७३
हा एकटाच भ्याला नाहीं; जात्याच कीं न हा भ्याड !
त्यांतहि माझ्याजवळी होते मोठे जुने जुने बाड. ७४
त्यांचीं एके दिवशीं पानें चाळीत मी सहज असतां,
सांगूं काय तुम्हां तो थोर चमत्कार होय जो दिसता ! १७५
सरसर सरसर सरसर सूक्ष्म किडा एक सर्षपप्राय
एकावरून दुसऱ्या पत्रावर धांव मारुनी जाय ! ७६
बघुनि तया, 'सांपडलें ! रोगाचें मूळ बीज सांपडलें !—'
म्हणुनी हर्षें नाचें मी, तों उपनेत्र खालतीं पडलें. ७७

लावुनि ते बघतों तों तेथुनि केंव्हांच तो लबाड पळे !
न कळे पत्ता त्याचा घरही झाडूनि पाहतां सगळें. ७८
तितकी खालीं पडली नसती ती मान हालुनी कांच,
होता योग मला तो सर्वजगन्मान्य व्हावयाचाच. ७९
पुष्कळ हळहळलों मी. तितका हातास लागता जरि तो,
निर्मूल करुनि त्याचें लोकांची सर्व काळजी हरितों ! १८०
अपराध काय माझा ? लोकांचें ह्या नशीबची फुटकें !
म्हणुनी सजीव माझ्या हातांतुनि लोकशत्रु तो सटके. ८१
पुष्कळ किडे चिकित्सा करुनि पुढें हा तपासिता झाला;
चोर परंतु पुन्हा तो नाहीं नजरेसमोर ह्या आला. ८२
कोणी **जपान** देशीं गेला म्हणती अजाणते लोक;
जावो, मरो ! तयाचा आतां मज काय हर्ष वा शोक ? ८३
नाहीं भल्याभल्यांना दुर्बिन लावूनि पाहतां आला;
केवळ योगबलानें दृग्गोचर तो मला किडा झाला. ८४
सांगा, तुम्हीच सांगा—काय चमत्कार हा असे थोडा ?
आहे पराक्रमाला माझ्या ह्या काय हो कुठें जोडा ? १८५
भिक्षुककुळांत जन्मा आलों मी ह्या भिकारड्या देशीं;
ओस गुणज्ञ जनांच्या पडल्या त्यांतहि कलींत ह्या वेशी. ८६
न तरी चीज गुणांचें माझ्या केंव्हांच जाहलें असतें;
हे **गुंड**भट्ट पाध्ये एव्हां कृतकृत्य होउनी बसते. ८७

आज न तरी उद्यां ह्या **गुंड**भटा ओळखील सरकार,
पदवी मिळोनि ह्याची लोकीं होईल वाहवा फार,— ८८
आशा मज ही होती; हेंच **घमंडे**हि सांगती कानीं;
आश्वासनहि दिलें मज होतें हें पूर्ण **बंडुनानां**नीं. ८९
आतां परंतु कळलें,—ह्यांच्या वचनीं धरोनि विश्वास
लाभ न कांहीं होतां झाला लोकांत मात्र उपहास. १९०
पैसा तुमचा गेला; माझे श्रमही तसे फुकट गेले;
गप्पा मारुनि ह्यांनीं कार्य न कांहींच पाहतां केलें. ९१
नामें गुणेंहि **भोला—नाथ**, तुम्हां ही म्हणून भूल पडे;
न कळे परंतु माझी अक्कल कां गुंग जाहली इकडे ! ९२
अक्कल नव्हती माझी झोंपीं गेली, परी करूं काय ?
जाणें अवश्य मज हे जेथें जातील आपले पाय. ९३
झालें होउनि गेलें; आतां तो मात्र नाद सोडून
चाला माझ्या तंत्रें,—मागें इतकेंच हात जोडून ! ९४
गप्पीदास **घमंडे**, ते गप्पीदास **बंडुनाना**ही;
त्यांच्या नादीं लागुनि नाहीं होणार फायदा कांहीं. १९५
पाहून मात्र घ्याव्या त्यांच्या ज्याकेट, बूट, पाटलुनी;
करणीकडे पहातां केवळ येईल शून्य आढळुनी. ९६
"ग्याझेटी" पदव्या त्या त्यांच्या लखलाभ त्यांस होवोत,
**रावबहादुर** म्हणवुनि तेच सुखें आपणास घेवोत. ९७

संस्कृत विशेषणांची पडली नसतांहि वाण ह्या भुवनीं,
ब्राह्मणधर्म विटाळी पदव्या घेवोनि कोण त्या यवनी ? ९८
सोडा नाद तुम्ही तो ! आतां पाहूं नका पुन्हां तिकडे !
संशय सोडुनि सारे या मी नेईन आपणां जिकडे. ९९
आहे विचार माझा कळवुनियां ठेविला तुम्हांला मीं;
सांगूं नका कुणाला आतां मी लागणार त्या कामीं. २००
आहे मुहूर्त ठरला; परवां **बुध**वासरीं **बबाड**मतें
वाजत गाजत जन्मा माझें येणार **गुंडमंडळ** तें. १
त्या जगदेकललामी-भूत महामंडळांत, यजमान !
पहिलें करा विभूषित अध्यक्षाचें तुम्हीच तें स्थान ! २
खर्चाचीं जीं कामें ठेवुनियां तीं तुम्हांकडे सारीं,
पाहीन मी व्यवस्था दुसरी होऊनियां ‘ सकडतारी. ’ ३
भलतीकडे न देतां कोठें दमडीहि एक फिरकून
घेतों कसा पहा मी थोड्या खर्चांत काम उरकून ! ४
पदव्या देणें घेणें तुमच्या हस्तेंच सर्व होणार;
सल्ला मात्र तुम्हां मी ह्या कामीं योग्य तीच देणार. २०५
बिल्ले गळोनि पडती, कां तरि घ्याव्या न तप्त मुद्रा ?—ही
मज होय सूचना मम भार्येची; तीहि वावगी नाहीं. ६
सुंदर सुंदर पदव्या आपण आधींच निवडुनी घेऊं;
कांहीं **नरसो**पंता **बंडु**भटासहि हव्या तरी देऊं. ७

आले पहा **घमंडे** ते **बंडोबा**हि नांव घेतांच;
वर्षें शंभर ह्यांना असलें आयुष्य पाहिजे साच. ८
संगें **सहस्रबुद्धे** तुमचे आहेत ते नवे व्याही;
आली आज कळेना इकडे इतक्यांतचि त्रयी कां ही ! ९
आले, परंतु आहे भारी त्यांचा स्वभाव वाईट;
म्हणुनी भाषण करितां सांभाळा जीभ आपली नीट. २१०
असलों जरी कदाचित् मीही कमजास्त बोललों कांहीं,
पुनरुच्चार तयाचा व्हावा हें इष्ट आपणां नाहीं. ११
येतात ते इथें तों इतकी दुसरी चिमूट ही घ्या कीं !
पदव्या जोडुनि संस्कृत मिळवा लौकिक इथें तसा नाकीं."१२

ॐ ॐ ॐ ॐ ॐ

आशीर्वचन निघालें **गुंडोबा**च्या मुखांतुनी हें तों
येउनि पुढें **घमंडे** म्हणती: "पदव्या तुलाच घे देतों ! १३
गेली **गुंड**भटा ! तुज सोडुनि अगदींच काय रे लाज ?—
चालविला त्वां इकडे म्हणुनी हा चोंबडेपणा आज ? १४
गप्पीदास **घमंडे**, हा गप्पीदास **बंडु**नानाही,
हें बोलतां कशी रे जीभ तुझी ही दुभागली नाहीं ? २१५
आले **सहस्रबुद्धे** आज मला आड हे जरी नसते,
बत्तीसही तुझे म्यां लोळविले दांत ह्या क्षणीं असते ! १६
तुज या **जमदग्नी**चा राग न अद्यापि काय रे कळला ?—
मुखरस म्हणून इतका आज तुझा हा यथेच्छ पाघळला ?

ऐकोनि जो दुरुत्तर बापाचेंही कधीं न घेणार,
'गप्पीदास' विशेषण **गुंड्या** तूं त्यास कोण देणार? १८
आटोप जीभ न तरी आतां खेंचीन थेट कोर्टांत !
माझें तुझें मग सुखें येईना नांव कां रिपोर्टांत ! १९
पुसता कोण इथें तुज म्यां जरि पदरांत घेतलें नसतें ?
जागेस आज कोठुनि ह्याहि तुझे पाय लागले असते? २२०
दारोदार तुला हा ह्यास्तव घेवोनि काय रे गेला ?
गौरव पत्रोपत्रीं ह्यासाठीं काय मीं तुझा केला ? २१
शास्त्री शास्त्री म्हणुनी मींच तुझे माजवूनि दे॑व्हारे,
यजमान देत आलों मिळवुनि तुजला बडे बडे सारे. २२
मन्मित्र मोठमोठे हिंदु मुसलमान पारशी ख्रिस्ती,
घालुनि भीड तयां मीं त्यांची तुज जोडुनी दिली दोस्ती. २३
अससि निरक्षर तूं तरि आश्रित समजूनि आपुला बुद्ध्या
नांवापुढें तुझ्या मीं जोडीं पदवी **महामहोपाध्या.** २४
दुखतें कपाळ माझें येतां पाहोनि पाहुणा गेहा,
भोजन तथापि तुजला प्रतिपक्षीं बोलवूनियां दे हा. २२५
प्राणोत्क्रमणघटी मज दिडकी देतां कुणास आठवली,
दे मी तथापि तुजला प्रतिमासीं रोख दक्षिणा चवली ! २६
काय न दिला घरांतुनि काल तुझ्या बायकोस चोळखण ?
त्याचें **गुंडभटा** तुज इतक्यांताचि काय होय विस्मरण? २७

‘ चुकणी जात भटांची ’ म्हणती ही आमची न तें खोटें !
देतों शाप तयांसचि भरती जे लोक आमचीं पोटें. २८

भिक्षुक **गुंडोबा** हा ! ह्याचा पुरुषार्थ दर्भ तोडावे !
फिरुनि घरोघर ह्यानें पोळ्या लाडू यथेच्छ झोडावे ! २९

गणना परंतु तुमची थोर गृहस्थांत होत असतांही
लवहि विचार तुम्हांला कां **भोलानाथरावजी** ! नाहीं ? २३०

आपण परस्परांचे बहु दिवसांचे न काय हो स्नेही ?
असले भिन्न जरी हे देह तरी एक आपला देही. ३१

आपण ईश धनाचे; ज्ञानाचा मी अगाध खंदकची;
कळते तुम्हांस माझी तैशी मजलाहि योग्यता तुमची. ३२

ऐसें असोनि आपण माझी कां हो करीतसां निंदा ?
**गुंडोबाच** करो हा, आपण असला करूं नये धंदा ! ३३

**गुंडोबा**च्या मागुनि येतों मी भेट आपली घ्याया,
तों होतीच निघाली हीहि इथें सर्व मंडळी याया. ३४

इकडे येउनि बघतों तों सुटलें तोंड आपलें भारी;
म्हणुनी माजघरांतचि बसली ही मित्रमंडळी सारी. २३५

बसलों तिथें परी हे होते येथेंच लागले कान;
आलें कळोनि तुमचें म्हणुनी संपूर्ण शब्दसंधान. ३६

एकैक जो मुखांतुनि तुमच्या बाहेर आज शब्द पडे,
ऐकुनि तो हृदया ह्या वाटे होतात आपले तुकडे ! ३७

त्यांतहि **गुंडोबा**चा दिग्विजयाचा विलोकुनी यत्न
मी दाखवीत होतों चवदावें ह्यास तत्क्षणीं रत्न. ३८
पाहें तुम्हांकडे मी, भीडहि पडली **सहस्रबुद्ध्यां**ची,
म्यां घोटलीच असती न तरी तपकीर चांगली ह्याची ! ३९
'गप्पीदास' विशेषण मज **भोलानाथजी** ! तुम्हींच दिलें,
निंदा करावयाला माझी ह्याला म्हणूनि संधि मिळे. २४०
उत्तेजन हें असलें हलक्या लोकांस ह्या तुम्ही देतां,
अपकीर्ति मात्र तेणें करुनी लोकांत आपली घेतां. ४१
गप्पीदास, घमंडा-नंदन, दुर्योधनादि वाक्सुमनीं
पूजा करितां माझी कां न तुम्ही पातकास व्हाल धनी ? ४२
वाईट फार तुमचें करणें हें!—फार फार वाईट !!
येइल कळुनि तुम्हांसचि पुसुनि मना आपल्या पहा नीट. ४३
गप्पीदास विशेषण देतां याला तुम्ही सुखें द्या तें;
दुर्योधनहि हवें तर शंभरदांही तुम्ही म्हणा मातें. ४४
म्हणतां परी 'घमंडा-नंदन' आधीं विचार नीट करा !
मग मी करीन माझा प्रकट तुम्हां सांगतों स्वभाव खरा. ४५
' नरशा ' म्हणुनि म्हणाला मज माझा सहज एकदां बाप;
थर थर परंतु कांपे तो माझा पाहतांच संताप. ४६
खोड अशिक्षित म्हणुनी त्याला ही फार लागली होती;
माझ्या परंतु एका शब्दानें साफ मोडिली हो ती. ४७

म्हणतों म्हणुनि अशी ही जीभ विटाळूं नका तुम्ही पुढतीं;
न तरी ह्या पापाची द्यावी लागेल आपणां झडती. ४८
साहेब मोठमोठे माझ्या झुलतात सर्वदां दारीं;
त्यांतही **बंडोबा**सम असती माझ्या वकील शेजारीं. ४९
न्यायासनापुढें मी नेतों मान्निंदकांस. हें माझें
ब्रीदहि तुम्हांस ठावें काय न जें सर्वतोमुखीं गाजे ? २५०
न्यायासनें हवीं कां ? देतों घरच्या वरींच मी न्याय—
ठावें न इष्टमित्रां माझ्या हें आपणांसमा काय ? ५१
विदित असोनि तुम्हांला सर्व खरा हा प्रकार, ही माझी—
निंदा तुम्हीं करावी कां **भोलानाथ**रावजी आजी ? ५२
यंदां तुम्हां मिळावी पदवी, दैवें परंतु ती न मिळे;
अपराध काय माझा आहे हो ह्यांत तो मला न कळे. ५३
कारितां प्रयत्न आळस न शिवे स्वप्नांतही कधीं ह्याला;
काय परंतु करावें जिकडे राजाच आडवा आला ? ५४
राजा काय बिचारा कारितो ? वर्ते तसा जशी वेळ;
हे मंत्रिमंडळाचे त्याच्या आहेत सर्वही खेळ. २५५
राजे होउनि आतां बसले आहेत आडनांवाचे;
अधिकार सर्व बघतां चालविती ते प्रधानची त्यांचे. ५६
हल्लींच्या राजांच्यां पाहुनियां शोचनीय ह्या स्थितिला
स्वर्गीं दुःख खरोखर व्हावें त्या सुज्ञ **जेम्स** * भूपतिला. ५७

* ह्या राजाच्या कारकीर्दीत पदव्यांचा विक्रय होत होता, हें इंग्लंदच्या इतिहासवाचकांस सांगणें नकोच.

वेडे म्हणोत कोणी—होता भूपाळ फार तो हंवरा;
वाटे परंतु मज तो राज्यश्रीचा ख़रखुरा नवरा. ५८
हंवरा असो, असो वा तो माझ्यासारखा महाकृपण;
जाय परंतु तयाचें त्याच्यामागेंच तें शहाणपण. ५९
पैसा ज्याच्या पदरीं पदवी निःशंक देउनी त्याला
अजरामर कीर्तीला तोच धरापाळ जोडिता झाला. २६०
नाहीं तरी पहा हे आतांचे आपले कसे राजे!
कोणी मागूं जातां पदवी करितात बंद दरवाजे! ६१
न रुचे तरी निजांगें ह्यांनीं पाडूं नये नवी चाल;
मोडुनि परी जुनी कां करिती हे व्यर्थ आमचे हाल? ६२
काळाचा महिमा हा, नाहीं आम्हातुम्हांकडे दोष.
रुसतां तुम्ही अम्हांवर, आम्ही कोणावरी करूं रोष? ६३
ही एक जाय वेळा, म्हणुनी आयुष्य काय हो गेलें?
आपण ह्याच विचारें स्वपरसमाधान पाहिजे केलें. ६४
पदवी तुम्हां मिळावी ही इच्छा फार आमची आहे;
जीव तदर्थचि समजा हा ह्या देहांत गुंतुनी राहे. २६५
हेतु मनाचा माझ्या तुमच्याही पूर्ण करुनि दावीन;
गाथा कर्तबगारी माझी साऱ्या जगास लावीन. ६६
**रावबहादुर** होउनि मिरवत आपण फिराल शहरांत,
होई न चित्त माझें **बंडोबा**चेंहि तोंवरी शांत. ६७

कसल्या **गुंडोबा**च्या पदव्या? शाब्दिक विशेषणें हो तीं !
खद्योत नांव, म्हणुनी आहे रवितेज काय खद्योतीं? ६८
पदव्या **गुं**डोबाच्या अखिलविशेषणविभूषणोपेता
होईल तोच बसुनी त्याच्या त्या **गुंडमं**डळीं घेता. ६९
पदवी कोण म्हणे ती "ग्याझेटीं" जी न छापुनी आली?
तो काय मान, ज्याची नाहीं 'लेव्हीं'त उजळणी झाली? २७०
**गुंडोबा** काय करी, प्रथम करीं मीच मंडळारंभ;
ह्या मूळ कल्पनेचा फुटला माझ्याच मानसीं कोंभ. ७१
स्थापित **घमंडमंडळ** माझें केव्हांच होउनी राहे;
पुष्कळ वर्षें त्याचें कामहि सुरळीत चाललें आहे. ७२
जो जो असे स्तुतिप्रिय त्याला संस्थेंत ह्या मिळे स्थान;
आहे सभासदांचें प्रतिवर्षीं म्हणुनि वाढतें मान. ७३
रचुनी परस्परांचे गात पवाडे परस्परीं जावे;
साद्यंत छापुनी ते दुसऱ्या दिवशींच पत्रकीं यावे. ७४
पत्रीं कुठें मिळेना स्थान, तरी हस्तपत्रकद्वारें
कळवीतसों जनांना आम्ही ते खेळ आमचे सारे. २७५
सर्व शहाणपणाचा मक्ता आम्हींच घेतला आहे,
धंद्याची त्या म्हणुनी संस्था ही फार काळजी वाहे. ७६
जो कोणी न सभासद संस्थेचा आमच्या कधीं झाला,
लोक म्हणोत शहाणा; आम्ही म्हणणार मूर्खची त्याला! ७७

शिकला असो नसो वा जो कोणी होय आमचा साथी,
विद्वत्तेचा समजा बोजा बसलाच त्याचिया माथीं. ७८

शीर्षीं असोनि इतकें ओझें हें, मान वाकतां खालीं
अवलोकनांत नाहीं कोणाच्या आमची कधीं आली ७९

विद्या शिकोनि पुष्कळ धरवेना तरतरीत मान, तरी
विद्या शिका कशाला? त्याहुनि निर्विद्यताच फार बरी. २८०

ह्यासाठींच दिला मीं माझा "कॉलेज कोर्स" सोडून--
म्हणती 'नको' जरी ते 'प्रोफेसर' सर्व हात जोडून. ८१

ते शिकविणार होते काय मला राहिलों जरी असतों?
बसती इतर तसा मी घोकंपट्टी करीतची बसतों. ८२

होउनि सहज परीक्षा एकामागून एक त्या पास,
पदवीधरमुकुटमणी असतों होऊन राहिलों खास. ८३

नाहीं परंतु, नाहीं घोकंपट्टींत त्या खरी विद्या!
मज हें कळे म्हणुनि मीं दिधला सोडून मार्ग तो बुद्ध्या. ८४

जागा * तीहि तशांतचि भरुनी पूर्वींच राहिली होती;
कारण हेंहि दुजें मज झालें सोडावया दिशा हो तीं. २८५

पदव्या न तीं, उपपदें; पदव्यांची थोरवी नसे त्यांत!
कोण तयांच्या मागें लागुनि म्हणवील आपणा भ्रांत? ८६

---

* कै. म. गो. रानडे यांस 'पदवीधरमुकुटमणि' म्हणत. अर्थात् ती जागा रिकामी नव्हती.

उपपदधर ते म्हणती " लोकीं आम्हीच पात्र पदवीस;"
इतर न मजसम असले अकलेनें ते जरी फडनवीस.+ ८७
कोण परंतु उपपदां पुसतो असल्या घमंडखोरांच्या ?
म्यां हा तपास केला भेटी घेवोनि थोरथोरांच्या. ८८
आलें कळोनि तेव्हां ह्यांना लोकीं कुठें नसे मान;
सरकारही न देई ह्यांच्या बोलांकडे कधीं कान. ८९
पदवीप्रदानसमयीं कोणी ह्यांना पुसे न दरबारीं;
ह्यावरुनीच जनांना किंमत ह्यांची कळोनि ये सारी. ९०
घोकंपट्टी करुनी बी. ए. एम्. ए. कसे तरी झाले;
म्हणुनी वाटे ह्यांना घोडे गंगेंत आपले न्हाले. ९१
होय परंतु चुकीचा त्यांचा हा समज, दाखवाया हें
"कमिशन"† सरकारानें बुद्धया नुकतेंच नेमिलें आहे. ९२
हा ओळखी तयां, ती ओळखिते सर्व मंडळी ह्याला;
आग्रह जरूर म्हणुनी साक्षीचा ह्यास पाहिजे झाला. ९३
होतां साक्ष पहा मी अकलेचे तोडितों कसे तारे !
तेज विलोकुनि त्यांचें विस्मित होतील लोक ते सारे ! ९४
सुचवीन त्यांस आधीं—' कालेजें' बंद करुनि टाका हीं,
कीं ह्यांपासुनि कोणा झाला नाहींच फायदा कांहीं. २९५
होऊं नये परीक्षा घेणें " युनिव्हर्सिटी " कडून पुढें;
कोणासही न कसलीं यावीं देण्यांत उपपदें तिकडे. ९६

+ नानाफडनवीस. † कर्झनशाहींतील युनिव्हर्सिटी कमिशन.

पदवी हवी तयाला सरकारानेंच मात्र ती द्यावी;
पूर्वी **घमंडमंडळ**संस्थेची मात्र संमती घ्यावी. ९७
इतकें झालें म्हणजे घोकंपट्टीस देउनी फांटा,
येईल सहज उपटुनि 'ग्र्याज्वेटां'चाहि काढितां कांटा. ९८
मग सर्व मोठमोठ्या जागा मजसारख्यांस मिळणार;
आम्हांतुम्हांकडे त्या पदव्याही थोर थोर वळणार. ९९
आनंदाच्या दिवशीं त्या ते "ग्र्याज्वेट" सर्व रडतील;
धड धड गडही त्यांच्या गर्वाचे ढांसळोनि पडतील. ३००
तेव्हां पहाल आपण, खालीं घालोनि आपल्या माना
धुंडित **घमंडमंडळ** यावें लागेल आमचें त्यांना. १
श्रेष्ठ किती हें माझें मंडळ त्या **गुंड**मंडळाहून
हें समजेल तुम्हांसहि मग तो सारा प्रकार पाहून. २
वरुनी **रावबहादुर** पदवी स्वयशें दिगंतरा भरुनी
गेला दुर्दैवानें नुकता अध्यक्ष आमचा मरुनी. ३
ती आपणा मिळावी जागा म्हणुनी **खुशालशेट** करी
खटपट; परंतु झाली आहे पूर्वींच योजना दुसरी. ४
व्हावें प्राप्त तुम्हांसचि तें **भोलानाथ**रावजी स्थान,
फुंकुनि सभासदांचे ठेवी आधींच म्हणुनि हा कान. ३०५
बघतों कोण शहाणा त्या कामीं आडवा मला येतो !
सारुनि सर्वां मागें ती जागा मी तुम्हांसची देतों ! ६

अध्यक्ष होय कोणी संस्थेचा आमचा कधीं जो तो
असतो **रावबहादुर**; नसला तरि बोल बोलतां होतो ! ७
अध्यक्ष तो जुनाही माझ्या बोलेंच हा धडा वळवी;
सत्वर **रावबहादुर** होउनियां दूर काळजी पळवी. ८
**रावबहादुर** म्हणजे–राजा, समशेर गाजवीणारा,
खुर्ची सरपंचाची बसुनि जमातींत साजवीणारा. ९
अर्थ असा भरुनी ज्या आहे पदवींत राहिला गूढ,
महती तिची किती हें **गुं**डोबा काय जाणतो मूढ ! ३१०
**रावबहादुर** पुष्कळ होउनि गेले; परंतु हा कळला
अर्थ जयास, असा मज त्यांत न एकहि अझून आढळला. ११
अर्थाची ह्या चर्चा आधीं संस्थेंत आमच्या झाली;
कोणाच्याही नव्हती तोंवरि लक्षांत गोष्ट ही आली. १२
षण्मास वाद झाला, कांहीं निष्पन्न जाहलें नाहीं;
डोकें परंतु माझें गुंतुनि विषयांत त्या सदा राही. १३
लिहिलें **विलायते**ला होउनि निरुपाय शेवटीं पत्र;
तिकडून अर्थ हा मज माझा कळवीतसे जुना मित्र. १४
मित्र न केवळ बघतां छात्रहि माझाच होय तो, त्याला
–कोणासही विचारा–ओनामा हाच शिकविता झाला. ३१५
मजपासुनीच त्याला अर्थ सविग्रह असेल हा कळला;
कालांतरें स्मृतिपथापासुनि माझ्या परंतु तो ढळला. १६

तो एक काय, माझे शिष्य असे बहु जिथें तिथें असती;
मेले किती तयांचीं नांवेंही ठाउकीं मला नसती ! १७
ऐका ! अर्थ पुढें तो ठेवीं मी मंडळापुढें जेव्हां,
आली कळुनि तयां ह्या पदवीची थोरवी खरी तेव्हां. १८
**रावबहादुर** व्हावें यावें जन्मा तरीच ह्या लोकीं—
ऐसें वाटुनि जो तो मंत्र सदा हा षडक्षरी घोकी. १९
**रावबहादुर** म्हणवुनि बिल्लयावांचूनि आपणा घेई,
पदवी-प्रेमाचि म्हणती बिल्ला मिळवून हें जया देई, ३२०
अध्यक्ष आमचा तो एकांतीं नेउनी मला सांगे,
'**विद्यारण्य** खरोखर **नरसोबा** ! लोटिला तुम्हीं मागें !' २१
गेला मरुनि बिचारा ! तसला दुसरा खरा गुणग्राही
आतां मिळेल ह्याची आम्हां आशाच राहिली नाहीं. २२
ऐकुनि तथापि माझे बोल **सुखात्मे** ! तुम्ही पुढें याल,
जागा कशीबशी तरि तूर्त तयाची भरून काढाल. २३
तुमचा तोटा नाहीं; **रावबहादुर** असेल व्हायाचें,
सत्वर तरी चला या ! आहे इतकेंच मागणें याचें. २४
करितां विलंब कोणी भलता घेउनि बसेल तें स्थान;
झालां **रावबहादुर** आपण, तरि अंतरेल हा मान ! ३२५
घ्या म्हणुनी ती जागा ! घ्या **भोलानाथ**रावजी ! मग हा
जो दाखवील करुनी थोर चमत्कार तो तुम्हीच पहा ! २६

हीं काय एक ? दुसऱ्या पदव्या असल्याच थोर थोर किती
मग मिळतील तुम्हांला, कोण तयांची करूं शके गणती ! २७
सेक्रेटरि मी तुमचा; **गुंडोबा**सारखे सकडतारी
त्या **गुंडमं**डळाचे माझ्या झुलतात शेंकडो दारीं ! २८
आत्मस्तुति न करावी—आहे हें तत्त्व ठाउकें मजला;
आज परंतु कराया ती हा निरुपाय होउनी मजला. २९
श्रमलां चऱ्हाट ऐकुनि **गुंड**भटाचें तुम्ही असाल खरें;
त्याचे तथापि न पुन्हां चालावे आपणापुढें नखरे, ३३०
म्हणुनी चरित्र माझें मीच तिखटमीठ लावुनी आजी
कथितों, सर्व जगाला कळवाया थोर योग्यता माझी. ३१

* * *

**विद्यारण्य** म्हणे मम जनका—स्वप्नांत देउनी भेट—
याया तुमच्या पोटीं **धात्या**चा लागला मला नेट. ३२
बाबा नको कशाला म्हणती ? सानंद या म्हणाले ते;
तों इकडे जन्माला, हे **नरसोपंत** जाहले येते ! ३३
**विद्यारण्य** स्वामी लोकीं अवतीर्ण ह्या पुन्हां झाले;
जातक वर्तवितां हें गणकांच्या प्रत्ययासही आलें. ३४
बाळपणांतचि माझे पाघळती गुण घरीं तसे दारीं;
विद्येंत काय—पहिला नंबर मी भांडणांतही मारीं ! ३३५
पंतोजीची धांदल काय उडे जी मला शिकवितांना
ती एक मीच जाणें, कीं हा मन्मित्र **बंडुभट**नाना. ३६

काना पडे न गुरुचा तों माझी त्यावरी चढे मात्रा;
तोहि म्हणे जोडावे हात अशा ह्या विचक्षणा छात्रा. ३७
'जा **मुंबईस**'—तो मज सांगे ठेवोनि वरदहस्त शिरीं—
'जागा विकास व्हाया ह्या बुद्धीचा तशी नसे दुसरी.' ३८
येतां इथें पहातों तों ही सारी नवी दिसे सृष्टि;
आश्चर्य काय माझी फाटे हा थाट पाहुनी दृष्टि ! ३९
झाली हळू हळू ती नीट, परी व्यंग राहिलें कांहीं
तें राहिलेंच ! लागू पडला उपचार एकही नाहीं ! ३४०
वाईट काय झालें ? पुष्कळ हा नित्य पुस्तकें वाची—
म्हणुनी नाजुक झाली लोकांना दृष्टि वाटते ह्याची. ४१
दुसराहि एक मोठा ह्यापासुनि फायदा मला झाला;
चष्मा लावायाचा हेतु मनाचाहि पुरवितां आला. ४२
कांहीं म्हणोत कोणी; नाहीं डोळ्यांस आरशी ज्याच्या
तें पोर मी समजतों, असल्या पिकल्या जरी मिशा त्याच्या. ४३
ऐका पुढें ! जसजसा पंडित हा इंग्रजी शिकत जाय;
गेले फुटत तसतसे अकलेलाही नवे नवे पाय. ४४
त्यांतहि घरीं अहर्निश हालेना इंग्रजीविना पान;
संपूर्ण सहज म्हणुनी भाषेचें होय त्या मला ज्ञान. ३४५
होय न एक परीक्षा तों मज सर्वज्ञता मिठी मारी;
अहमहमिका चतुर्दशविद्यांसह येउनी बसे दारीं. ४६

ज्याकेट शर्ट अंगीं, धोतरही पायघोळ पायास,
'ग्र्याज्वेटी' पागोटें; न म्हणे 'ग्र्याज्वेट' कोण मग यास? ४७
'ग्र्याज्वेट होय मी'—हें म्हणतां कोठें कधीं कधीं स्पष्ट,
जिव्हेसही न माझ्या पडले केव्हांहि त्यामुळें कष्ट. ४८
ग्र्याज्वेट काय करिती? जो मीं पुरुषार्थ आजपर्यंत
केला त्याचा नाहीं लागायाचा तयां कधीं अंत. ४९
उठणें बसणें माझें मोठ्या लोकांत सर्वदा चाले;
थोरपणाचें दुसरें साहित्यहि साध्य हें मला झालें. ३५०
तात्काळ त्यामुळें ये करितां मज कीर्तिमंदिरारंभ,
रोपीं सहज तयाचे एकामागून एक मी स्तंभ. ५१
अल्पवयांतचि माझा भाग्योदय हा असा कसा झाला
ह्याचें मजाचि न केवळ, वाटे आश्चर्य सर्व लोकांला. ५२
पाणी भरी मराठी, केर घरांतील इंग्रजी काढी;
ढाळी चवरी मजवर संस्कृत माझी धरोनियां दाढी. ५३
भाषा अशा किती मज येती त्यांची मला नसे गणती;
म्हणुनी 'असंख्यभाषाकोविद' मज थोर पंडितहि म्हणती. ५४
कसला बिकट असेना भाषेचा प्रश्न मजपुढें आला—
माझ्या साह्याविण तो कोणी शकला न सोडवायाला. ३५५
गोष्टी ऐकुनि केवळ अवगत तो विषय जाहला मातें;
जग हें अगाध माझें इतिहासज्ञानही तरी गातें. ५६

इतिहासकार पुष्कळ झाले होतील यापुढेंहि, तरी
कळवितसें मीच खरी त्या विषयाची जगास मातबरी. ५७
आश्चर्य काय ! जिकडे सर्वहि इतिहासकार गडबडले,
मचि तयां ते देईं जुळवुनि संबंध मागले पुढले. ५८
वृत्त कळे हें जेव्हां माझ्या द्वारेंच पत्रकारांना,
ते लाविती जनांना मत्स्तवनें हालवावया माना. ५९
त्यांतहि घोर अरण्यीं जाउनि हुडकुनि जुने जुने दगड
फडफड वाचीं जेव्हां त्यांचीं मी अक्षरें अगड बगड, ३६०
तेव्हां माना डुलवुनि पंडित म्हणती—कधीं कुठें असला
नाहीं अरण्यपंडित आम्हांला ह्या जगीं दुजा दिसला ! ६१
जेव्हां बुद्धिबळें मी मंथुनि साहित्यसिंधुपात्रास
निर्मीं पद्यसुधारस तर्पाया सर्व लोकमात्रास, ६२
गडबड काय वदूं जी उडली कविमंडळांत त्या काळीं !
धडपड करीत सारे बसले ठेवोनि लेखण्या खालीं ! ६३
रसिकजनांच्या झुंडी घिरट्या घालोनि आमच्या दारीं
म्हणति—पुरातन काव्यें आम्हीं फाडून टाकिलीं सारीं ! ६४
कविवर तुम्हीच **नरसोपंत** खरे **व्यास-वाल्मिकी**मागें !
होउनि सनाम आजी नाचाया ही अनामिका लागे* ! ३६५

* हाताच्या बोटांनीं कवींची गणना करितात. कनिष्ठिकेनें कालिदासाचा निर्देश केला. पण पुढें त्याच्या तोडीचा कवि मिळेना म्हणून पुढची अंगुली नामरहित म्हणजे अनामिका राहिली; नरसोपंतामुळें तिचें नामकरण झालें; असा आशय.

ज्ञानेश्वरें पलायन केलें; मुक्तेश्वरेंहि ती वाट
धरिली निमूट;—ऐशी आहे लोकांत बातमी दाट. ६६
होउनि निराश लोकां बुडवा सांगून आपलीं कवनें
श्रीधर मयूर वामन गेले वसवावयास घोर वनें! ६७
रसिकीं दिला असा हा एकमतें आपला अभिप्राय,
हें वर्तमान तारा-यंत्रद्वारें दिगंतरीं जाय. ६८
अगणित मला मिळालीं तेव्हां आहेत सर्टिफिकिटें तीं
साक्ष निरंतर माझ्या विद्वत्तेची जगास ह्या देती. ६९
त्यांतहि गोष्टीची ह्या राजे लोकांस लागतां वर्दी
शेलापागोट्यांची होय बिऱ्हाडांत आमच्या गर्दी. २७०
ह्याहुनि अधिक गुणांची माझ्या झाली विलायतेंत चहा;
काफी न पीच कोणी रस्तोरस्तीं वहात जाय चहा! ७१
खोटें म्हणूं नका हें; आहे सारा प्रकार हा घडला;
विश्वसनीय पुरावा ह्याचा माझ्या घरीं असे पडला. ७२
नुकती राजकवीची जागा तिकडे पडे जयीं खालीं
तेव्हां अर्ज करा ही पहिली मजलाच सूचना झाली. ७३
अर्ज करावा ऐसें आलें होतें मनांत ह्या आधीं;
थोडा पगार म्हणुनि पडलों नाहीं परंतु त्या नादीं. ७४
'प्रोफेसर'हि मराठी भाषेचा लागला तिथें जेव्हां,
विद्वज्जनीं शिफारस केली माझीच आग्रहें तेव्हां! २७५

गप्प न ही, मजजवळी पत्रें असती तिथून आलेलीं;
स्वारी स्वधर्म बुडतो म्हणुनी केवळ तिथें न ही गेली. ७६
इकडेहि मोठमोठया खालीं होतात ज्या कधीं जागा,
त्यांतुनि तुम्हां हवी ती म्हणतें सरकारही मला मागा! ७७
घ्यावी ही अथवा ती?—ह्या गोष्टीचा निकाल मी लावीं
तों त्या भरोनि जाती; आहे सर्वांस गोष्ट ही ठावी. ७८
होतां परंतु सत्वर **नरसो**पंतास थोर अधिकारी
पाहील—खास म्हणतों—ही माझी मित्र-मंडळी सारी. ७९
जितकी जितकी गावी तितकी तितकी स्वकीर्ति ही थोडी,
वर्णीन जों अधिक तों अधिकाचि लागेल आपणां गोडी. ८०
म्हणुनी रहस्य मोठें सांगायाचें तुम्हांस एक उरे,
सांगुनि तितकें करितों माझें हें मी पुराण आज पुरें. ८१
पदवीधर मुकुटमणी त्या **माधवराव रानड्यां**नाही
माझी जरूर लागे अडचण जेव्हां पडे कधीं कांहीं! ८२
**श्रीज्ञानराज**विषयीं परवां जो वाद थोरला माजे,
विद्वत्व सर्व तेव्हां आलें त्यांना कळोनियां माझें. ८३
**ज्ञानेश्वरा**स केवळ होतों मी ओळखीत नांवानें;
सांगेन मी परी त्या ग्रंथांतिल मोजिल्याविना कानें! ८४
ऐकुनि सुधीस त्या हें ठावें असलेंच पाहिजे म्हणुनी
निज मित्रांत मला ते घेती अत्यंत आदरें गणुनी. ३८५

तेच न केवळ, मजला पंडित तेलंग देशमुख छत्रे
मानीत फार होते; दाविन त्यांचीं हवीं तरी पत्रें. ८६
काय करूं ते मेले न तरी त्यांच्या मुखेंच हो आजी
असती कळुनि तुम्हांला आली ही थोर योग्यता माझी. ८७
इतका थोर पुरुष मी असुनी पदवी मला न कां कांहीं—
ही शंकाहि जनांना आल्यावांचूनि राहिली नाहीं. ८८
शंका खरी; परंतु न पदवी जों आपणासमा लोकां
मिळवुनियां म्यां दिधली, तोंच मला मान पाहिजे तो का? ८९
आहे फार भुकेला हा नरसोपंत मानपानाचा,
काय न घ्यावा ह्यानें म्हणुनि समाचार बंडुनानाचा? ३९०
गुंडोबा हा आश्रित, त्याचीही सोय पाहिजे झाली:
नजरेसमोर माझ्या आधीं ही सर्व मंडळी आली. ९१
ह्या सर्वांच्या पूर्वीं पदवी घेउनि बसेन मीच तरी—
जन काय, इतर मज तीं हंसतिल तुमच्याच दारचीं कुतरीं! ९२
पदवी काय हवी ती हूं हूं म्हणतां मिळेल आज मला;
नलगे परंतु मज ती जोंवरि तुमचा मनोरथ न पुरला. ९३
म्हणतों घमंडमंडळसंस्थेचे व्हा म्हणून अध्यक्ष,
लागेलची प्रभूचें सहजचि मग आपणाकडे लक्ष. ९४
न मिळे इथें तरी मी पदवी आणुनि अमेरिकेहून
देइन तुम्हां हवी ती; ठेवा ही आज भाक घेऊन! ३९५

तुमचा तसाच घेतों त्याहि परामर्ष **बंडुनानाचा**;
अंगीकार हवा तर मीहि तशा त्या करीन मानाचा. ९६
**गुंडभटास** नकोशा वाटत असल्यास ह्या जुन्या पद्ध्या,
त्यानें स्वयें हव्या त्या घ्याव्या बनवून राजरोस नव्या. ९७
निंदा परंतु त्यानें न करावी आमची—अशी शपथ
घेवोनियां धरावा त्याला जो आवडेल तोच पथ. ९८
पडले **गुंडोबाचे** माझेही बोल आपल्या कानीं;
आतां विचार अपुले कळवावे स्पष्ट **बंडुनानांनीं**. ९९
बोला हो **बंडोबा** ! ह्या **भोलानाथ**रावजींना जें
हितकर असेल बोला तेंच तुम्ही ! हेंच मागणें माझें. ४००

* * * * *

पडतांच शब्द **नरसोपंताचे** शेवटील हे कानीं,
दिधला पीळ मिशांना चष्मा सारोनि **बंडुनानांनीं**. १
म्हणती:—हवा कशाला आग्रह ? मी बोलणारची आहें;
रसना अशा प्रसंगीं कोणाची हालल्याविना राहे ? २
बोलायाचा बघतां पहिला माझाच आज अधिकार—
कीं मजवरीच आहे **काकांचा** रोष आमच्या फार. ३
त्यांनीं मघांच म्हटलें—'हें सारें बंड **बंडुनानाचें**,
तो नाचवी तसा हा **भोलानाथ**हि न शंकतां नाचे.' ४
हें तों कांहीं नाहीं ! 'शकुनीमामा' म्हणूनि आज मला
सर्व शहाणपणाला **काकांनीं** आमच्या निरोप दिला. ४०५

भोळे खरेंच भोळे हे **भोलानाथ** आमचे काका !
शकुनीमामा दिसता पुतण्याही त्यांस एऱ्हीं हा कां ? ६
कसलें उभारिलें हो **काका** ! ह्या बंड **बंडुनानानें** ?
ऐकूं तरी मला द्या त्याचा कांहीं प्रकार ह्या कानें ! ७
पदव्याबिदव्यांचीं हीं बंडें जीं जीं नवीं नवीं निघती,
मजसम तुमचे पुतणे स्वार्थापुरतेच त्यांकडे बघती. ८
पैसा पदवी माझी--माझा पैसाच आप्त मित्र खरा—
न शिरे कधीं मनीं ह्या पैशावांचुनि विचारची दुसरा. ९
पैसा जिकडे, तिकडे **बंडोबा** हा न सांगतां जाय;
सहवास नित्य असतां काका नकळे तुम्हांस हें काय ? ४१०
पदवीचें जें काका तुमच्या डोक्यांत हें भरे खूळ,
माझ्या कृतींत त्याचें दिसलें कोठें कधीं तुम्हां मूळ ? ११
फुरसत आम्हां वकिलां नाहीं असले करावया ढंग;
केवळ तुमच्याकरितां म्यां ह्या कार्यांत घातलें अंग. १२
**अष्टागरां**त आपण पहिल्या प्लेगांत आपल्या गांवीं
असतां रहात घडली मात तुम्हांला न काय ती ठावी ? १३
'रावबहादुर' पदवी तिकडे त्या आपल्या **जनोबा**ला
मिळतां, तुम्हांस आहे विदित समारंभ थोर जो झाला. १४
एकीकडे हजारों कामें सारून आपलीं सारीं
आली होती तिकडे **गुंडभटा**चीहि तेधवां स्वारी. ४१५

माझीं **नरसोबा**चीं लांबलचक भाषणें तिथें झालीं;
होतीं सटीक छापुनि तिथल्या तीं पत्रकांतही आलीं. १६
आपण घरीं परत तो करुनि समारंभ साजरा येतां
**नरसोबा**च अनुग्रह पहिला हा होय आपणा देता. १७
हांसत धरोनि तुमचा हात **घमंडे** तुम्हांस हें म्हणती—
'उजळा न कां **सुखात्मे** स्वयशाचीही तुम्ही अशी पणती ? १८
बोला स्पष्ट खरोखर इच्छा तुमच्या मनीं असेल तरी;
खटपट करुनि तुम्हां मी मिळवुनि देतों बहादुरी नवरी.' १९
वदलां तुम्हीहि —'तर मग लागा त्या खटपटीस जा लागा !
लागेल खर्च जो जो मजपासुनि तो न शंकतां मागा !' ४२०
म्हटलें तयींच म्यां कीं—' खर्चाची बाब ही असे **काका** !
आधीं विचार करुनी पाउल मग आपलें पुढें टाका. २१
दिसतो प्रकार सारा बाहेरुनि पाहतां जरी नीट,
आहे **जनुकाकां**ची अंत:स्थिति फार फार वाईट.' २२

* * *

**नरसोबा** हें ऐकुनि मजवर रागावुनी म्हणाले कीं—
'ही आपसांत असली **बंडोबा** ! चांगली नसे बेकी. २३
पुष्कळ असोनि पदरीं पैसा पदवीशिवाय जो मेला,
संसारभारवाहक जन्मा येवोनि तो फुकट गेला ! २४
केला **जनुकाका**नें इतका तो खर्च खर्च हो कसला !
हें काय **बंडुनाना** घेउनि भलतेंच वेड हा बसला ! ४२५

मी जाणतों **जनूनें** पिशव्यांच्या सोडिल्या किती गांठी;
थाट दिखाऊ हो तो केवळ खाविंदबंदगीसाठीं ! २६
दुष्काळांत म्हणे तो पोसुनि चवदा हजार लोकांस
म्यां लोकरक्षणाचा सरकारास न पडूं दिला त्रास. २७
कळलें परंतु मज कीं चवदांच्याही मुखीं न घास पुरा
पडला, तोंच **जनोबा** म्हणति--पुरे अन्नसत्र बंद करा ! २८
साहेब थोर कोणी आला होता तपासणीकरितां,
केवळ म्हणुनि **जनोबा** उडवी तो रंग तेवढ्यापुरता. २९
त्यानें दिले हजारों कपडे दुष्काळपीडितां लोकां—
औदार्याचा त्याच्या वाजे हा वृत्तपत्रकीं डंका. ४३०
कळलें परंतु मज कीं, तो ते त्याच्याच दे कुळां कपडे;
हातीं इतर जनांच्या चिंधीही एक फाटकी न पडे. ३१
कृत्यें **जनुकाकां**च्या औदार्याचीं अशींच हीं सारीं;
ह्याची साक्ष तुम्हांला त्यांचे देतील सर्व शेजारी. ३२
भोळे **बंडोबा** हे, भोळे ते पत्रकारही असती,
म्हणुनी **जनुकाकां**च्या केवळ गप्पाच ऐकुनी फसती. ३३
खर्च न करितां कांहीं वाढावें मात्र आपलें नांव--
असती सर्व तयांचे इतक्यासाठींच हे लपंडाव. ३४
बघतां खरें जगीं ह्या युक्तीनें साधतें जसें काम,
न तसें विद्या पुष्कळ अथवा पदरीं असोनिही दाम. ४३५

खर्च करावा लागे; थोडे असले प्रसंग परि येती;
उरकुनि ते युक्तीनें थोड्या खर्चांत शाहणे घेती. ३६
ह्यांताचि **जनुकाकांचें** आहे बघतां खरें शहाणपण;
लोकीं उदार म्हणवुनि घेती जात्या असोनिही कृपण. ३७
कित्ता **जनुकाकांचा** हा **भोलानाथजी** ! तुम्ही वळवा;
खर्चाशिवाय केवळ माझ्या साह्यें बहादुरी मिळवा. ३८
वकिली **बंडोबानें** केली, केली कधीं न कारकुनी;
खर्चाविण न विचारचि शिरती ह्याच्या कधीं म्हणून मनीं. ३९
पुसतो जुन्या पुराण्या कोण विचारास ह्या अशा आज ?
आम्हां सुशिक्षितां तों वाटे ह्याची खरोखरी लाज ! ४४०
साधूनि कार्य घ्या हा आहे अनुकूल जोंवरी काळ;
खर्चाची न बसावें ऐशा वेळीं जपीत जपमाळ. ४१
दुष्काळांत पहातां पदव्यांचें पीक माजतें फार;
प्लेग तशांताचि आला आहे ! भाग्यास काय ह्या पार ! ४२
ह्या पुण्यपर्वकाळीं पदवीगंगाप्रवाह हा वाहे;
तीर्थप्रसाद तो घ्या साधुनि ह्यांताचि शहाणपण आहे.’ ४३

**नरसोपंताचे** हे **काका** ! रुचले तुम्हां तयीं बोल;
**पंतांचेच** म्हणाले **गुंडोबाही** विचार बहु खोल. ४४
मी जाहलों निरुत्तर ! आपणही आग्रहें मला म्हटलें
कीं—सर्वी ह्या कार्यीं संशय सोडूनि पाहिजे झटलें. ४४५

'ठीक' म्हणालों मी 'तर, आग्रह माझा नसेच **का**काजी !'
काय करील बिचारा काजी जिकडे धनी धनी राजी ? ४६

दुसरा विचार—कन्या **नरसोबा**ची मला मिळो सून
म्हणुनी खटपट माझ्या चालू होती सदा घरांतून. ४७

ती कळतांच तुम्ही मज वदलां—जुळवा खुशाल संबंध;
सोडीन आपल्या मी पिशव्यांचेही हवे तरी बंध. ४८

होते म्हणत **घमंडे**—'मागा देइन हवी तरी चमडी;
मजपासूनि परंतु न हुंडा मिळणार एकही दमडी !' ४९

दुष्काळ अर्ध बुडवी; बुडवी उद्योग सर्व हा रोग;
ह्यांच्या पायीं आम्हां वकिलांचा पीडला पुरा भोग. ४५०

पैसा पदरीं नाहीं, हुंडयाची वाट ही अशी लागे,
होती तरी घरांतुनि लग्नाची नित्य टोंचणी मागें. ५१

**काका !** अशा प्रसंगीं धीर तुम्हीं देउनी मला थोर,
पळवुनि दूर मनाचा माझ्या निःशेष लाविला घोर. ५२

इच्छेविरुद्ध तुमच्या जातां मी ह्या मुकेन लाभाला—
मुख्य विचार तयीं ह्या **बंडुभटा**च्या मनांत हा आला. ५३

रुसतील हे **घमंडे**, लक्ष्मी स्वांगें घरास आलेली
म्हणतील लोक मागें मूर्खपणानेंच माझिया गेली,— ५४

निश्चय तुमच्या तंत्रें वागायाचा म्हणूनि मीं केला;
जिकडे तुम्हीं तिघांनीं नेलें तिकडे निमूट हा गेला. ४५५

आपण निघूनि आल्यापासुनि अष्टागरांतुनी इकडे,
हें सर्व मित्रमंडळ कार्यीं ह्या आपल्या झटोनि पडे. ५६
**नरसोपंत** घमंडे धरिती हातांत सर्व अधिकारी;
पतकरलीं गुंडोबा म्हणती आम्हांस दैवतें सारीं. ५७
साथी तुम्हांस मिळती त्यांत **जगन्नाथ**रावजी शेंडे,
लावून ठेविती ते तुमच्या मागें बडीं बडीं धेंडें. ५८
झालीं **गुंड**भटाचीं नित्य नवीं चालतीं अनुष्ठानें;
तिकडे **भुजंग**जोशी म्हणती—द्या अश्वधेनुधनदानें. ५९
नाच तमाशे होती, होती गाणींबजावणीं खानें;
कंटाळले बिचारे आचारी नित्य वाढितां पानें. ४६०
कित्ता तुम्हांस **काका ! ज**नुकाकांचा न वळवितां आला,
म्हणुनी आज हजारों रुपयांचा व्यर्थ खर्च हा झाला ! ६१
होतें कार्य तरी ह्या परवा नसती तुम्हांस खर्चाची;
व्यय हा परी निरर्थक झाला चित्तास फार हें जाची. ६२
एकचि काय, अहाहा ! पदवीचे पांच पाडवे गेले;
नाहीं तरी मनोरथ दैवें सिद्धीस आपले नेले ! ६३
नवल न तेणें तुमच्या चित्ताची नष्ट होउनी समता
दुर्वाग्विषा स्वमित्रीं आसींही जाहलां तुम्ही वमतां ! ६४
आम्हीं परंतु तसल्या बोलांनीं रुष्ट आपल्या व्हावें,
उपकार सर्व तुमचे तितक्यासाठींच विसरुनी जावें,— ४६५

होय कृतघ्नपणा हा ! म्हणुनि **घमंडे** तुम्हांस जें आज
वदले कांहीं त्याची वाटाया त्यांस पाहिजे लाज. ६६
मंत्र गुरूस गुरूचा फळतां शिष्यापराध तो काय ?
**नरसो**पंताचें मग इतकें खवळोनि पित्त कां जाय ? ६७
मंत्र तुम्हांस तसा ह्या **गुंडोबा**सहि जगत्प्रसिद्धीचा
**नरसो**पंताचि देती, मक्ता घेवोनि कार्यसिद्धीचा. ६८
पैसा तुमच्याजवळी, काय शकाल न तुम्ही करायास ?
पाडूनि घ्याल समयीं पदव्यांची आपणापुढें रास ! ६९
चाळे परंतु असले **गुंडोबा** हा करूं म्हणेल, तरी
उपहास मात्र होउनि अपयश पडणार शेवटीं पदरीं. ४७०
दीक्षा **गुं**डोबाला देतां होय न विचार हा नीट
केवळ म्हणून राहे इतका हा आज होउनी धीट. ७१
स्थापी **घमंडमंडळ** रोपुनि गुरु कीर्तिमंदिरस्तंभ,
करिता झाला तिकडे शिष्यहि तों **गुंडमंडळा**रंभ. ७२
मित्र खरे ते माझे, परि त्यांचे रंग ढंग हे न मला
रुचती; म्हणून त्यांच्या नादीं लागूनि हा नसे भ्रमला. ७३
बघती मला सदा ते त्यांच्या त्या मंडळांत ओढाया;
उलट परी मीच तयां सांगें ते सर्व ढंग सोडाया. ७४
गौरव सर्व महाजन करिती ज्याचा विशेषणीं जाड्या,
पदवीवाल्यांच्याही ज्याला बघतांच थांबती गाडया, ७५

इतकी आज पहातां गाजे लोकांत थोरवी ज्याची,
त्या मज कसल्या पदव्या सांगा देणार मंडळें ह्यांचीं ? ७६
देतात रावसाहिब रावबहादुर मलाच ते मान,
सल्ल्याविना न माझ्या हाले त्यांच्या घरीं कधीं पान. ७७
देवें दिली असे ह्या **बंडुभटाला** निरंकुशा वाणी;
कानीं पडे जयाच्या तो अमृताची तिला म्हणे खाणी. ७८

म्हणुनी जेव्हां जेव्हां वक्तृत्वाचीं प्रदर्शनें भरुनी
कोणी पदवीवाले गौरव घेतात आपला करुनी, ७९
अत्याग्रहें तयीं ते **बंडुभटा** बोलवूनि ह्या नेती;
आस्वाद वाक्सुधेचा तेव्हां याच्या असंख्य जन घेती. ४८०
होतां तुम्ही जनांना तोच उद्यां थोर लाभ देणार,
फसला बेत परी तो म्हणुनी वाईट वाटतें फार. ८१
व्हावी आज निराशा सर्वांची हें प्रभूस आवडलें;
तिकडे उपाय नाहीं म्हणुनी आतां न पाहिजे रडलें. ८२
देवापाशीं आतां सर्वांनीं नित्य हेंच मागावें—
कीं पाडवे न असले लोकांना रडविते पुन्हां यावे ! ८३
आहे समर्थ भगवान् तो बाबुलनाथ टेंकडीवाला,
भीतां कशास काका ? तुमची संपूर्ण काळजी त्याला. ८४
आहे देव भुलेश्वर, मुंबादेवीहि आपली आहे,
प्रभुही कृपाकटाक्षें कनकेश्वर तो तुम्हां सदा पाहे. ४८५

सांगा **नरसोपंता**,–विद्वत्तेची घमेंड सोडून
शरण रिघावें देवा अथवा देवीस हात जोडून. ८६
**गुंड**भटाला सांगा,–आतां सोडूनि लोकनिंदेला
दिग्विजयार्थ तयानें धांवा प्रभुचाच पाहिजे केला. ८७
काकूसही म्हणा कीं, गृहिणीला आमच्या तुम्हीं काल
आहे कबूल केली, ती द्या धाडूनि भरजरी शाल. ८८
तुमच्या बहादुरीस्तव देवांचीं झिजविलीं तिनें दारें;
पुरतील हेतु तुमचे आशीर्वादें तिच्याच हे सारे. ८९
पदवी तुम्हां मिळो वा न मिळो काका ! परंतु वचनाला
सहसा न बाध तुमच्या त्या काकूच्याहि पाहिजे आला. ४९०
कांहीं तरी निमित्तें होऊंद्या सत्यदेवपूजा ती;
दिडक्या चार पडूंद्या **गुंड**भटाच्या कशा तरी हातीं ! ९१
निंदा करी तरी तो वंद्य असे आपणा उपाध्याय;
भ्रष्ट असो श्रेष्ठ तरी ब्राह्मण,–वदला न हें **तुका** काय ? ९२
लावा खुशाल वाद्यें, लौकिक त्यांच्याच वाढतो गजरें;
आहे दिली सुपारी थांबवितां मग कशास ते मुजरे ? ९३
द्या खाना; न दिला तरि पालनजी सर्व खर्च घेणार,
**नट**साहिबास कां मग वर्जवितां व्यर्थ आपलें दार ? ९४
लग्नहि मुहूर्त पाहुनि **खंडू**चें आमच्या करुनि टाका;
मळ तो तुम्हीच म्हणतां हाताचा होय आपल्या काका ! ४९५

तुमचा पैसा जावा, काका! कोणास हें बरें वाटे ?
अब्रू परंतु तुमची जाय विलोकूनि हृदय हें फाटे ! ९६
वचनें तुम्हींच दिधलीं; केला लोकीं तुम्हींच बोभाट;
अब्रूसाठीं म्हणुनी सगळा केलाच पाहिजे थाट. ९७
बुडवावें व्रत सूत्रें तिळ खाउनि ह्यांत फायदा नाहीं—
हें सांगतील तुमचे हेच हवे तर तुम्हां नवे व्याही. ९८
बोला **सहस्रबुद्धे** ! आपण आतां असेंच बोलावें
कीं जें परिसुनि हर्षें देवगुरूचेंहि शीर्ष डोलावें ! ९९
बी. ए., एम्. ए. मध्यें वरिला पहिला जसा तुह्मीं मान,
आज तसाच वरा हो इकडे तर्पूनि आमचे कान. ५००

म्हणती **सहस्रबुद्धे**: "बोला म्हणतात **बंड्नाना** हे,
बोलुनि परंतु इकडे न कळे उपयोग कोणता आहे. १
मजहुनि वडिल वयानें हे **भोलानाथ** आमचे व्याही;
उपदेश ऱ्यां करावा ह्यांना अधिकार हा मला नाहीं. २
अभ्यासाविण ज्याच्या विद्वत्तेचें गळां पडे दावें,
त्या ह्या **गुंडभटा**ला कोणी घालुनि नवे धडे द्यावे ? ३
ज्ञानें विद्यारण्यहि ज्यास उणा आपणाहुनी दिसला,
बोध करावा त्या ह्या **नरसोपंता**स आज मी कसला ? ४
बी. ए., एम्. ए. आम्ही, घोकंपट्टींत आमचें ज्ञान;
म्हणतात हेच,—कोणी आम्हां उपपदधरां न दे मान. ५०५

आहे ठीक; तुम्ही जें म्हणतां त्यासहि असेल आधार;
वाद कशास हवा तो, त्यांतुनि निघणार कोणतें सार ? ६
व्यवहार कोणताही त्यावांचुनि आमचा नसे अडला,
तोंवरि हवा कशाला आम्हां तो मान आपणाकडला ? ७
मान नको मज, माझ्या विनतिकडे मात्र द्या जरा कान ;
समजेन मीच म्हणजे माझा मज सर्व पावला मान. ८
सांगीतलें कितीदां ह्या **भोलानाथ**रावजींना मी—
करितां व्यर्थ कशाला द्रव्याचा होम ह्या अशा कामीं ? ९
रुचलें नाहीं माझें म्हणणें त्यांच्या कधीं मनाला तें;
झाले सिद्ध कराया त्यांचा ते नाश आपल्या हातें. ५१०
इतकी खटपट करुनी हाताला आपल्या न फळ लागे,
तेव्हां आतां झाले व्याही हे आज आमचे जागे ! ११
**भोलानाथ सुखात्मे** ! ऐका ! अझुनी तरी जरा ऐका !
गेला पुष्कळ, आतां ह्या कामीं घालवूं नका पैका ! १२
गांठुनि मधांच मार्गीं तुमचे हे **गुंडभट्ट** मज म्हणती—
'आम्ही उद्यां यशाची पाजळुनी दाखवूं पहा पणती. १३
तो साजरा कराया थोर समारंभ या सपरिवार;
घरचेंच कार्य आहे; आग्रह मग कां हवा तुम्हां फार ?' १४
कसली पणती ? कसला थोर समारंभ ? हें मला कांहीं
न कळुनि मुखाकडे मी सस्मित त्यांच्या पहातची राहीं. ५१५

तों ते म्हणती,-पदवीधर असुनी भ्रांत कां तुम्ही झालां ?
ठावें काय तुम्हांस न पदवीचा पाडवा उद्यां आला ? १६
फळले प्रयत्न, पडली साखर तोंडीं **भुजंग जोशा**च्या;
होई न कां विलंबें, होय तयाची परी सुफल वाचा. १७
नवसास देव माझ्या **काकू** म्हणतील पावला आतां;
न म्हणाल त्या प्रतिज्ञा **नरसोबा**च्या उद्यां तुम्ही बाता. १८
बोलूं अधिक कशाला ? आम्हां पदव्या उद्यांच मिळणार,
म्हणुनी आली आहे काल **घमंड्यांस** खासगी तार. १९
पत्रहि आलें होतें **लाटांचें** एक त्यांस म्हणतात;
पडलें परंतु कोठें सहज खिशांतूनि काढितां हात. ५२०
आशय तथापि त्याचा आम्हां त्यांच्याकडोनि सर्व कळे;
सांगीतलें तयांनीं तेंच तुम्हां मीहि सांगतों सगळें:- २१
‘ **रावबहादुर भोलानाथ** ’ म्हणुनि थांबुनी जरा मध्यें,
म्हणती हांसत ‘ झाले **गुंडोबा** हे **महामहोपाध्ये !** २२
त्यांना (तेच म्हणाले) पदवी दिधली ‘ **अशी अशी**’ कसली;
**बंडोबाच्या** नांवा धरुनि म्हणति **रावसाहिबी** बसली; २३
तुमचें, **धोंडभटाचें शेंड्यांचें**ही तिथें निघे नांव;
नकळे परंतु तुमच्या पदव्यांची थांबली कुठें धांव. ’ २४
आलें हसूं तयीं तें मोठ्या कष्टें धरोनि आवरुनी,
सर्व मनोराज्यकथा मीं ही माझ्या पडूं दिली श्रवणीं. ५२५

मग म्यां म्हटलें—‘ भटजी ! वेड्यांचा हा भरोनि बाजार,
पांचा वर्षांमध्यें हेंच तुम्हीं काय काढिलें सार ? २६
कोण रिकामा बसला **लाट घमंड्यास** तार धाडाया ?
पुसतो कोण तुम्हां ? ही मिरवितसां कां फुशारकी वायां ? २७
पदवी नाहीं कोणा ह्या येत्या पाडव्यास द्यायाची,
आज्ञा कशी तुम्हां ही कळली नाहीं अझूनि रायाची ? २८
सर्व जगाचा म्हणती कळतो आधीं जया समाचार,
**नरसोपंतां**नीं त्या नाहीं ही वाचिली कशी तार ? २९
सर्वत्र आज पिटिली दैनिक पत्रीं असोनि ही द्वाही ,
तुमच्याच गोष्ट कानीं आल्यावांचूनि ती कशी राही ? ५३०
तार न **न**रसोपंतां तुमच्या ती वाटते मला आली;
घोळे ध्यानीं त्यांच्या ती स्वप्नीं पूर्ण कामना झाली ! ३१
स्वस्थ बसा जा आतां, भलभलते हे करूं नका चार;
कळवा यजमानासहि हें सांगुनि आमचा नमस्कार, ३२
इतकें म्हणतों मी तों—‘तुमचें हें सर्व बोलणें लटकें—’
ऐसें म्हणूनि रागें **गुं**डोबा शीघ्र तेथुनी सटके. ३३
मीहि तयाच्या मागुनि ह्या दोघांच्या सवें इथें आलों,
जें बोललां तुम्हीं तें मौनें साद्यंत ऐकता झालों. ३४
सर्वज्ञ काय तो मी, बुद्धीचा मीच काय तो खाडा--
एका मागुनि दुसरा हाच इथें होय वाचिता पाडा. ५३५

नाहीं नवा पहातां आज इथें जो प्रकार हा झाला;
हा पाहण्यांत माझ्या इतरांच्याही अनेकदां आला. ३६
जिकडे जाती तिकडे हे तुमचे **गुंडमंडळा**धिपती,
हेही **घमंडमंडळ**संस्थापक हेंच काम चालविती. ३७
असती भोळे **भोलानाथ** ! तुम्हांसारखे कुणी त्यांना,
हे लावितात निजगुणगानें ह्या हालवावया माना. ३८
भोळा मी न तसा, मज रुचती ह्यांचे न हे असे चार,
म्हणुनीच बोलतों मी आज इथें स्पष्ट शब्द हे चार. ३९

ॐ ॐ ॐ

युक्तिबळानें साधुनि चारी पुरुषार्थ घ्यावया पाहे,
त्या ह्या **गुंडभटा**चें ठावें मज सर्व युक्तिबळ आहे. ५४०
ह्याच्या अंगीं ज्यांच्या पादरजाचीहि योग्यता नाहीं,
निंदा करोनि त्यांची लोकीं हा थोर व्हावया पाही. ४१
गंधहि नसोनि ठावा शास्त्राचा, हा सशास्त्र उपचारें
म्हणतो रोग जगांतिल करुनी निर्मूळ टाकितों सारे ! ४२
सामर्थ्याचा नसुनी ह्याच्या ह्यालाच लागला ठाव,
दिग्विजयाचा ह्यानें आहे निःशंक घातला आव ! ४३
युक्ति न, केवळ ह्याच्या दुर्बलता ही विचारशक्तीची;
संमति त्यांत मिळाली **नरसोपंता**समान व्यक्तीची; ४४
उल्हास ह्यास आधीं, भर पडली त्यांत फाल्गुनाची ती;
उडली भीति मनाची, पडल्या धुळींत सभ्यजनरीति ! ५४५

हे पोरखेळ ह्यांचे पत्रीं छापून एकदां आले,
पुरुषार्थ साध्य म्हणजे म्हणती हे सर्व आपणां आले ! ४६
हे पाहती महाजन व्हाया असल्याच जाहिरातींनीं,
रात्रीचा दिवस कधीं केला होता परंतु वार्तांनीं ? ४७
ह्यांचा उजेड तोंवरि जोंवरि ह्या क्षुद्र वर्तिका जळती;
त्या विझतांच भराभर भारतखद्योत हेहि मावळती ! ४८
होतां नये प्रकाशित जेव्हां असल्या परप्रकाशानें,
सुचतात मंडळीला ह्या तेव्हां नवस धान्य-धन-दानें. ४९
हरतां उपाय तेही मग हे स्थापूनि मंडळेंच नवीं,
म्हणती देऊं घेऊं जी जी ज्याला रुचेल ती पदवी ! ५५०
पुरुषार्थ हाच ह्यांचा ! हा ह्यांचा होय सर्व दिग्विजय !
युक्तिप्रयुक्ति ह्यांच्या सगळ्या इकडेच पावतात लय ! ५१

ॐ ॐ ॐ

रागावोत **घमंडे**, करितों त्यांची म्हणोत मी निंदा:
**गुंडभटा**ह्ानि हा ते चालविती फार चांगला धंदा. ५२
नित्य शिफारस करुनी **गुंडभटा**च्या विशाल बुद्धीची,
गुरुजी हेच तयाला दीक्षा देती जगत्प्रसिद्धीची ! ५३
लोकीं स्वकीय लौकिक परनिंदेनेंच वाढतो मात्र,
शिकता मंत्र **घमंड्यां**पासुनि त्यांचाच होय हा छात्र ! ५४
निज निंदा करितां निज शिष्य **घमंड्यां**स आज आढळला,
आश्चर्य ह्यांत कसलें ? मंत्र गुरूचा गुरूसची फळला ! ५५५

गुरुजी करीत आले शिष्य करी अधिक त्याहुनी काय ?
मग कां **नरसोबां**च्या पायाची आग मस्तकीं जाय ? ५६
निंदा करितो म्हणुनि हे **गुंडोबा**स मानिती नीच,
मग तो तसला कां हो स्वीकारावा अमार्ग ह्यांनींच ? ५७
जो आज हेच करिती ग्राज्वेटांवरि दुरुक्तिवर्षाव,
निंदेशिवाय दुसरें त्याला साजेल कोणतें नांव ? ५८
उपपदधरांस पदवीधर म्हणतां लाजतात हे आज,
सोंग परंतु तयांचें घेतां ह्यांना न वाटली लाज ! ५९
जेव्हां ह्यांची माझी पहिली **बे**लापुरांत गांठ पडे,
**नट**साहेबहि होते तुमचे ह्यांच्यासवें तयीं तिकडे. ५६०
ग्राज्वेट हे **घमंडे** मित्र बडे साब म्हणविती त्यांचे;
समजूनि थोर ह्यांना जो तो ह्यांच्या सभोंवती नाचे. ६१
तों ह्यांच्या दुर्दैवें येती ह्यांचे तिथें सहाध्यायी,
हे दोघेहि पळाले त्यांला बघतांच मागल्या पायीं ! ६२
बी. ए. पदवी घेउनि तेव्हां पदवीधरांत हे घुसले,
मग कां राजश्री हे पदवीवर आज त्या असे रुसले ? ६३
पदवी अशा उपायें येई संपादितां न ती जेव्हां,
"द्राक्षें आंबट तीं" हें वाटाया ह्यांस लागलें तेव्हां ! ६४
म्हणती—घोकंपट्टीमध्यें त्या ज्ञान आमच्या कसलें ?
अभ्यासक्रम सोडुनि म्हणुनि बृहस्पति घरींच हे बसले ! ५६५

न तरी सहज परीक्षा एकामागून एक देऊन
पदवीधरवर-पद हे बसले असते कधींच घेऊन ! ६६
ऐकोनि मात्र ध्याव्या ह्यांच्या ह्या वल्गना अशा थोर;
तथ्य तयांत किती हें कोणी सांगेल जाणतें पोर ! ६७
घोकंपट्टी कसली ? खडतर तो मार्ग पाहुनी भारी
भ्याली म्हणूनि मागें सरती झाली हळूच ही स्वारी ! ६८
'कॉलेजकोर्स' धरुनिहि होते करणार काय हे तिकडे ?
अस्थिरमति हे, ह्यांना कोठुनि अभ्यासयोगसिद्धि घडे ? ६९
होतां तिथें निराशा ' स्थापुनि माझें घमंडमंडळ मी
कारितों त्या पदव्यांचें—'पंडित म्हणतात हे--'महत्त्व कमी!'५७०
ह्यांना नकोत म्हणुनी कॉलेजांना रजा मिळायाची !
ह्यांच्या शिफारशीनें पदव्यांची देवघेव व्हायाची ! ७१
योग सुवर्णयुगाचा असला येणार हें असुनि ठावें,
सोंग कशाला ह्यांनीं ग्र्याज्वेटाचें उगाच आणावें ? ७२
एकच काय, अशीं हीं सोंगें ह्यांचीं किती तरी असती:
वक्ते आज, उद्यां कवि, परवां होवोनि एडिटर बसती; ७३
वैय्याकरण कधीं तों होती इतिहासकारही केव्हां;
येई प्रसंग जैसा तैसें हे सोंग आणिती तेव्हां. ७४
तेच म्हणाले,—त्यांचीं सोंगें असलीं विलोकुनी नाना,
पंडित ' अरण्यपंडित ' पदवी देती न मागतां त्यांना ! ५७५

केव्हां होय गुणांची ह्यांच्या इतकी विलायतेंत चहा ?
पाहे वहात जातां रस्तोरस्तीं कळे न कोण चहा ! ७६
केव्हां रसिक जनांचीं जाउनि त्यांच्या घराकडे मांदी,
देती झाली ह्यांना आद्यकवीची बसावया गादी ? ७७
रसिक जनांनीं इतकें ज्यांचें सौरस्य वानिलें मोठें,
ह्यांस विचारा ह्यांचे असति जगन्मान्य लेख ते कोठें ? ७८
इकडून एक दुसरें घ्यावें तिकडून वाक्य ओढून,
द्यावी साल वडाची बेमालुम पिंपळास जोडून, ७९
आलीं कशींबशीं तरि भरितां पानें अशीं दहा बारा,
गेला समजुनि म्हणजे ग्रंथ समाप्तीस आपला सारा ! ५८०
मिळवुनि एडिटरांचीं आशीर्वचनें हवीं तशीं चार
निःशंक भाविती जे व्यासाचे आपणांस अवतार;– ८१
काय विशेष **घमंडे** असल्या ह्या ग्रंथकारकाहून
करिती मला कळेना इतका हा गर्वभार वाहून ! ८२
गुणगणलोहितबिंदु न जिकडे तिकडेच गर्ववायु वळे–
हे मित्र **रानड्यांचे** म्हणवित असतां कसें न ह्यांस कळे? ८३
सांगा कधीं क्षमेचा मेरु ढळे तो दुरुक्तिवर्षावें ?
मग ह्या त्यांच्या मित्रें इतकें क्रोधांध आज कां व्हावें ? ८४
कसली मैत्री ? केवळ नांवें घेऊनि थोरथोरांचीं
हे वाढवूं पहाती भोळ्या लोकांत थोरवी ह्यांची ! ५८५

पाठविती जीं ह्यांना **पंडित तेलंग देशमुख छत्रे**
कां तीं खिशांत असतां दाखविती हे न काढुनी पत्रें ? ८६
कोठें तार ? कुठे तें **लाटांचें** पत्र ह्यांस आलेलें ?
दावा म्हणतां म्हणती-बहुधा मार्गांत सांडलें गेलें ! ८७
कसलीं पत्रें ? कसल्या तारा ? हे चार त्या **शकाराचे** !
शुष्कप्रलाप अथवा असती ह्याच्या म्हणा गकाराचे ! ८८
समजोत हे अशानें वाढे लोकांत मान्यता ह्यांची;
लोक परंतु अशांना पदवी देती घमंडखोरांची ! ८९
पत्रीं कोठें ह्यांच्या कीर्तीचा काजवा कधीं चमके,
कळते तयींच लोकां असती कोणी गृहस्थ हे अमके ! ५९०
विद्यारण्याचाही घालुनियां दाखवोत हे आव,
गेली परी न ह्यांच्या कीर्तीची ह्यापुढें कधीं धांव. ९१
सोडुनि घमंड **नरसो**पंत जरी पाहतील हें नीट,
त्यांनाच सर्व त्यांचे चाळे हे वाटतील वाईट. ९२
सर्व शहाणपणाचा मक्ता घेउन परंतु जे बसले,
भलतेंच काम त्यांना आहे रुचणार कोठुनी असलें ! ९३

ॐ ॐ ॐ

ह्यांचेच मित्र दुसरे हे माझे आप्त **बंडुभट नाना**;
गोडी कामांची ह्या असल्या नाहीं खरोखरी ह्यांना. ९४
मानाचीही बघतां ह्यांना नाहींच फारशी चाड;
खोड परंतु तयांना आहे दुसरीच लागली द्वाड. ५९५

श्रीमंत पाहिला कीं ह्यांची गळुनी विचारशक्ति पडे;
हे वाघ एरव्हींचे, कोल्हे होती न शंकतां तिकडे. ९६
जिकडे श्रीमंतांची स्वारी तिकडेच हे असायाचे;
डोळ्यांविना न त्यांच्या ह्यांना कांहीं कधीं दिसायाचें! ९७
बोलाशिवाय त्यांच्या ह्यांचे कांहीं न ऐकती कान;
हाले जरा न त्यांची तों ह्यांची होय वांकडी मान! ९८
शब्द मुखांतुनि त्यांच्या पडतां बाहेर शीघ्र झेलावे;
अर्थ कळो न कळो वा–ठीक म्हणालां–म्हणोनि डोलावें! ९९
लागे जरी करावी त्यांची त्यांच्या घरीं गुलामागिरी,
हंसत म्हणावें–मी हें माझ्या घरचेंच सर्व काम करीं! ६००
स्वार्थार्थ मार्ग असला **बंडोबा** हे म्हणोत मी धरिला,
त्यांनीं परंतु नकळे ह्या कर्में अर्थ कोणता वरिला. १
खेळ न **गुंडोबा**चे **नरसोबा**चेहि ह्यांस आवडले,
पूर्वींपासुनि त्यांच्या मग हे फंदांत कां वृथा पडले? २
सांगितलें **सुखात्मे**! काय तुम्हां एकदां तरी ह्यांनीं—
कीं कार्यभाग **काका** होणें नाहीं अशा उपायांनीं? ३
झाला खर्च तयाची आली समजोनियां निरर्थकता,
बोध तथापि तुम्हां हे करिते झाले पहा कसे नुसता! ४
म्हणती–सुरू करावीं **गुंड**भटाचीं पुन्हां अनुष्ठानें;
घ्यावे नवस, करावे ब्राम्हण संतृप्त भोजनें दानें! ६०५

झालीं पुष्कळ झालीं दानें संतर्पणें अनुष्ठानें;
नवसाहि पुष्कळ फळले; खाववितां भागलां तुम्ही खानें. ६

भोलानाथ सुखात्मे ! सोडा ! हा नाद ह्यावरी सोडा !
उद्योग हाच केला आजवरी, काय होय तो थोडा ? ७

नाहीं अशा उपायें नाहीं पदवी तुम्हां मिळायाची !
जों जों जाल पथें या तों तों ती दूरची पळायाची ! ८

रावबहादुर पदवी-वर इतुकी भक्ति आपली बसली,
सांगा परंतु आपण केली आहे 'बहादुरी' कसली ? ९

केले सरहद्दीवर जाउनि सर कोणते तुम्हीं किल्ले ?—
म्हणुनी सरकारानें द्यावे खुष होउनी तुम्हां बिल्ले ? ६१०

दुष्काळांत भुकेल्या लोकांना वांचवावयासाठीं
होत्या कधीं सुखात्मे ! पिशव्यांच्या सोडिल्या तुम्हीं गांठी? ११

अन्नावीण अकिंचन लोक भुकेनें बघूनि तडफडतां
घास मुखीं कोणाच्या तुमच्या हातून जाहला पडता ? १२

रोगमुखीं प्राणाच्या नित्य हजारोंच आहुती पडती;
पति सुत तात निमाले म्हणुनि किती बायका मुलें रडती; १३

गाडीच्या चाकांचा झिजला जाईल आपल्या रबर,
म्हणुनी कधीं तयांची आपण गेलां न घ्यावया खबर ! १४

पडतां विद्यार्थ्यांचा चुकुनि कधीं पाय आपल्या दारीं,
म्हणतां—आल्या मागें द्या हें लावूनि पोर माघारीं ! ६१५

भूतदया ही तुमची ! तुमचें औदार्य थोर हें असलें !
लोक अशाच गुणांनीं पदवीधर काय होउनी बसले ? १६
पदवी सुलभ न इतकी ! लोखंडाचे सदा चणे खावे
तेव्हांच योग्यता नर पदवीची—संत सांगती—पावे. १७
'रावबहादुर झाले **जनुकाका**, कां न आपणहि व्हावें ?'
म्हणती असें **घमंडे**, म्हणुनि तुम्हां तेंच वेड लागावें ! १८
यावें **नरसोबानें**,--जोडा गाडी म्हणोनि सांगावें;
ओळख असो नसो वा अमक्यातमक्यास भेटुनी यावें ! १९
घ्यावे नवस,—म्हणावें **गुंडोबानें**—अशीं अशीं दानें
द्यावीं म्हणोनि आहे सांगितलें त्या **भुजंगजोशानें**. ६२०
द्यावे **बंडोबानें** ताव मिशांवर तुम्हांकडे बघुनी;
म्हणत असावें—**काका** ! थोर तुम्हांसारखे तुम्हीच जनीं. २१
कोणी **घमंडमंडळ** कोणी त्या **गुंडमंडळा** दावी;
एक म्हणे ग्याझेटी, संस्कृत पदवी दुजा म्हणे घ्यावी. २२
तुमच्या मनीं **सुखात्मे** ! पदवीचें वेड भरविलें ज्यांनीं,
ह्याहुनि विशेष सांगा काय तुम्हांकडुनि करविलें त्यांनीं ? २३
एका **मंडलिकां** जी साजवितां **रावसाहिबी** आली,
तिजकरितां तो मानी फेऱ्या कोणाकडे कधीं घाली ? २४
पदवीधरमुगुटमणी पदवी जी **रानड्यां**कडे जाई,
नवसीत देव होत्या तिजकरितां कोणते **रमाबाई** ? ६२५

**तेलंग** विश्वविद्यापीठीं जो त्या प्रधानपद पावे,
तो त्या मानासाठीं कोणा जोशाकडे कधीं धांवे ? २६
जो आज लोकनायक म्हणवुनि घेतो **फिरोजशा मेथा**,
तो त्या पदवीसाठीं खाने कोणास जाहला देता ? २७
मान मिळावा म्हणुनी वैद्यशिरोरत्न **भालचंद्र** सुधी
लावीत कौल बसला कोणा आराध्यदेवतेस कधीं ? २८
'पंडितवर' पद चारी खंडांतिल पंडितीं जयास दिलें,
त्या **भांडारकरांनीं** विप्र कितीदां तदर्थ जेवविले ? २९
झाले **बोडस** झाले **झळकीकर**ही महामहोपाध्ये,
स्वमुखें कधीं गुणांची वाजविली आपल्या तिहीं वाद्यें ? ६३०
पदवीस हे महाशय पात्र कृतींनींच आपल्या झाले;
**नट** साहेब न कोणी पदव्या ह्या ह्यांस द्यावया आले ! ३१
गुण ते गुणाचि; तयांना असल्या नसल्याहि आडनांवाच्या
पदव्या, तथापि वृद्धिक्षय तेजाला कधीं नसे त्यांच्या. ३२
नांव न, थोर नराची थोर यशःश्रीच थोरवी वदवी;
पदवीमुळें न साजे सुयश, यशानेंच साजते पदवी. ३३
पदवीवाल्यांसंगें पदव्या त्यांच्या निघोनि जातात,
सुयशें परंतु अमराचि थोरांचीं होउनी रहातात. ३४
गेले नरपति भीते अमरहि ज्यांशीं करावया समर;
बसले अशोक अकबर भोज शिवाजीच होउनी अमर! ६३५

**दौलतराव** निमाले, गेले **यशवंतराव**ही मरुनी;
दौलत अमर यशाची माय **अहल्याच** बैसली वरुनी ! १३६

गेले मरुनि **शिकंदर बोना**पार्टहि किती मरोनि तसे;
सौधीं भव्य यशाच्या देवी **व्हिक्टोरिया** सदा विलसे ! ३७

**यदुकुलविलास** गेले, गेले विलया **बरीदशा** गाजी;
लोकां स्मरण तयांचें देती **हेमाडपंत, दामाजी.** ३८

नष्ट **जहांगिर**, नष्टचि नांवाचे **अलमगीर**ही झाले;
सत्ता **कबीर-नानक-चैतन्यां**ची अझूनिही चाले. ३९

पदवी दे न **शिवाजीराय तुकाराम-रामदासां**ना,
तत्कृति म्हणुनि न लाविति काय जनां हालवावया माना ? १४०

पदवीवांचुनि मेले **घोरपडे, फडनवीस नाना**ही;
काय म्हणून यशाची त्यांच्या न फिरे चहूंकडे द्वाही ? ४१

बिल्ले पुष्कळ होते त्या **राजा राममोहना**जवळी
काय म्हणून तयाची आज यशस्तनु वसुंधरा कवळी ? ४२

जी आज तो **सयाजीराय** गुणांनींच पात्रता झाला,
देती काय तयाची पदवी ती लोकमान्यता त्याला ? ४३

पदवी नव्हती म्हणुनि **ग्ल्याड्स्टन** जन्मूनि काय जाय वृथा ?
पदवीवाला **दादाभाई**शीं कोणता तुम्ही तुळितां ? ४४

पदवीशिवाय गेला **केशव**, गेला तसा **दयानंद**,
काय म्हणूनि यशाचा त्यांच्या लोकीं न राहिला गंध ? १४५

पदवीमुळेंच झाले अजरामर काय **बाटलीवाले** ?
**पेटीट** काय केवळ पदवी मिळवूनि लौकिका आले ? ६४६

रावबहादुर झाले **छत्रे**, झाले तसेच **देशमुख**,
म्हणुनीच काय त्यांना होते वंदीत **रानडे**प्रमुख ? ४७

आहे थोर मिळाला पदव्यांचा कोणता असा वांटा,
म्हणुनी बसता झाला आज जगन्मान्य होउनी **टाटा** ? ४८

पदव्या किती मिळाल्या होत्या त्या 'सार्वजनिक' **काकां**ना,
म्हणुनी चरित्र त्यांचें ऐकावेंसेंच वाटतें काना ? ४९

बिल्ले गळ्यांत नव्हते अटकविले थोर थोर मानाचे
**शंकरशेटी**च्या त्या म्हणुनि पुसे नांव काय **नाना**चें ? ६५०

गेले **भाऊ दाजी** ! पदवी न मिळे तयांस आमरण,
काय म्हणून यशाचें त्यांच्या लोकांस होय विस्मरण ? ५१

पदवीशिवाय दोन्ही **विष्णु परशुराम** चालते होती,
त्यांच्या दिव्य यशाच्या म्हणुनि विझाल्याच काय हो ज्योती ? ५२

पदवीविना न मेले **चिपळुणकर** बाप लेक ते काय ?
नांव म्हणून तयांचें त्यांच्या मागेंच काय हो जाय ? ५३

ज्येष्ठ तसाच कनिष्ठहि पदवीवांचूनि लोक हा सोडी—
आहे कोण विसरला **कुंट्यांची** त्या म्हणून ती जोडी ? ५४

पदवी होती कसली त्या **गो**कुळदास **ते**जपाळाला,
म्हणुनि यशोधन त्याचें हरुनी नेतां नयेच काळाला ? ६५५

बिल्ले घेउनि कसले रस्तोरस्तीं **जव्हेरिलाल** फिरे,
म्हणुनी म्हणे भरतभू त्या न महात्म्यास मी कधीं विसरें? ६५६
झाली कसली पदवी त्या **शंकरपंत पंडिता** मिळती,
स्मरण म्हणून तयाचें होतां पंडित अझूनि हळहळती? ५७
हलवूनि लेखणीनें सर्व महाराष्ट्र देश जो सोडी,
**आगरकरा**पुढें त्या बिल्ले पडते फिके किती कोडी? ५८
बिल्ला नव्हता म्हणुनी तो **वामनराव ओक** लोकांना
शोच्य न होउनि राहे काय? पहा त्या पुसोनि **ओकां**ना. ५९
'पंडित' पदवी दिधली **हरि माधव पंडिता** न सरकारें,
पांडित्य काय त्याचें गेलें म्हणुनी तयासवें सारें! ६६०
नव्हता **खान**बहादुर, शम्सुल्उल्माहि जाहला नव्हता,
कोण न म्हणुनि कधीं त्या बघुनि **सयानीस** जाहला लवता? ६६१
सामान्य कोण पदवी नाहीं म्हणुनी **सुरेंद्रनाथ** म्हणे?
पदवीशिवाय पडलें त्या **वाच्छा**च्या यशांत काय उणें? ६२
जो शिष्य **रानड्यां**चा—**रामा**चा होय त्या जसा **द्रोण**—
त्या **गोखल्यास** पदवी नाहीं म्हणुनी न ओळखी कोण? ६३
जाउनि पुसा हवें तर त्याही **बळवंतराव टिळका**ला—
पदवी नाहीं म्हणुनी त्याला कसला कमीपणा आला? ६४
पदवी लहान मोठी **चंदावरकर** अझूनि तो न वरी,
लाजे काय यश:श्री म्हणुनि तयावर धरावया चवरी? ६६५

जी त्या **कीर्तिकरानें** सरहद्दीवर बहादुरी केली,
'व्ही.सी.'तो न मिळविता होय म्हणुनि काय ती वृथा गेली? ६६६
ओंवाळाव्या पदव्या **तय्यबजी**च्या सुतावरूनि किती ?
सांगेल नीट कोणी गणिती त्यांची करोनि काय मिती ? ६७
पदवीविना **गुणांची** होतच नसती जगांत पारख या,
म्हणते काय **गव्हर्नर गो**कुळदासा बघूनि—"**पारख**,या !" ६८
लावी दूर पिटाळुनि पदव्या आल्या असूनिही दारीं,
वेडा म्हणूनि सांगा वाटे कोणास आज **मलबारी** ? ६९
तुमच्या बहादुरीची चाड जरी मंडळीस ह्या असती,
सांगा ! तुम्हीच सांगा ! काय मिळाली तयांस ती नसती ? ६७०
आहे परी जयांनीं भव्य यशाचाच जोडिला गांव,
त्यांना हवें कशाला तुमचें हें व्यर्थ कोरडें नांव ? ७१
रावबहादुर आतां गेले समशेर गाजवीणारे;
खुर्च्या सरपंचांच्या पडल्या मोडून जाणती सारे. ७२
उपयोग काय असुनी अधिकारावीण कोरडा मान ?
दे न शहाणा म्हणुनी असल्या गोष्टींकडे कधीं कान. ७३
पदवी **जनुकाका**ला चुकुनि मिळाली असेल एखादी,
उंच परंतु **सुखात्मे** ! झाली त्याची न त्यामुळें गादी ! ७४
यादी जनुकाकांची असल्या लोकांत वाढते तों तों
पदव्यांचाही त्यांच्या मान **सुखात्मे** ! कमी कमी होतो. ६७५

राहे धरुनि **सवाई माधवरायास** एकट्या जेव्हां,
कौतुकवती जनांना झाली जी फार वाटती तेव्हां, ६७६
त्या ‘ रावसाहिबी’ला रस्तोरस्तीं बघूनि फिरतांना--
कोण म्हणेल शहाणा?—“आपणही त्या वरू चला माना !” ७७
गादी उंच हवी तर आणा अंगांत योग्यता आधीं;
तिष्ठत बसेल मग त्या पदव्यांची आपणांपुढें मांदी ! ७८
पैसा जवळी असला केवळ म्हणुनीच योग्यता न मिळे,
पास परीक्षा होउनि न मिळे वा ग्रंथ घोकुनी सगळे. ७९
देई **घमंडमंडळ** अथवा देई न **गुंडमंडळ** ती;
जिकडे सद्गुण सत्कृति केवळ तिकडेच होय ती वळती. ६८०
पैसा टका नलगे ह्या कार्या, ही कृती असे साधी;
ओळख मात्र तुम्हांला झाली तुमचीच पाहिजे आधीं. ८१
निर्मळ लोकमताचा ठेवुनियां आपणापुढें मुकुर,
निजगुणदोष पहावे; म्हणजे होईल कार्य हें सुकर. ८२
निजगुणदोषचिकित्सा इतरांकडुनीच पाहिजे व्हाया;
पाठ कशास न ये जिस मुखही भिंगाविना विलोकाया ? ८३
सोडुनि **घमंडमंडळ**, गर्व धनाचाहि सोडुनी वायां,
सुजनसमागम जोडा नित्य मनोमल समग्र झाडाया ! ८४
विद्या तशीच लक्ष्मी केवळ, विनयेंच शोभली जाते,
हें सांगती न केवळ दाखविती वर्तुनी तसें ज्ञाते. ६८५

वर्ता तसेंच संतत; लोकीं ह्या तरतरीत जो मान
धरुनी चाले, त्याच्या उंचीचें होतसे कमी मान. ६८६

लावा परोपकारीं, नाचतमाशांकडे न निज वित्त !
भ्रांत स्तुतिपाठानें होऊं देऊं नका कधीं चित्त ! ८७

येईल जोडितां धन किंबहुना ज्ञानही हरवलेलें;
न मिळे पुन्हा यशोधन परि जें सांडूनि एकदां गेलें ! ८८

म्हणुनी सदां जपत जा त्यास तुम्ही आपल्या जसे प्राणा !
निरलस सिद्ध तदर्थचि आर्त जनांच्या असा परित्राणा ! ८९

म्हणवा—मनुष्यलोकीं येउनियां हा मनुष्यपण मिळवी !—
पळवी मोह मतीचा, इतर जनांनाहि सत्पथें वळवी ! ६९०

साधुनि ‘ मनुष्य ’ पदवी घ्या ही आधीं अशा उपायांनीं;
पदव्या इतर तुम्हां मग लोटाव्या वाटतील पायांनीं. ९१

कळवा **गुंडो**बांना, हेंच **घमंड्यां**स आपल्या कळवा—
खटपट भलतीसलती सोडुनि आधीं मनुष्यपण मिळवा ! ९२

वळवाल यत्न आपण हे जरि इकडेच आपले सगळे,
मिळतील निश्चयानें इच्छितसां त्याहुनीहि गोड फळें. ९३

येऊंद्या योग तसा ! सुदिन उजाडेल थोर तो जेव्हां,
आला म्हणा **सुखात्मे** ! ‘ पदवीचा पाडवा ’ खरा तेव्हां. ६९४

## २. " **मेथाजीची मजलस.** "

शहर **पुण्या**ची लज्जा रक्षण करण्यांत होउनी दंग
शिकविति भक्तजनां जे नित्य कराया नवे नवे ढंग— १
स्मरुनि **खुन्या मुरलीधर**, तो **भांग्या मारुती**हि स्मरुनी
घेऊं **रासविहारी घोष** चला या प्रसन्न तो करुनी. २
अध्यक्षाची जागा द्यावी **बळवंतराव टिळका**ला,
दृढनिश्चय हा होता गेल्या वर्षींच आमचा झाला. ३
नकळत परंतु कपटें घालुनि डोळ्यांत आमच्या धूळ
त्या **भूपेंद्रसुरेंद्रीं दादाभाई**स धाडिलें मूळ. ४
आलें कळोनि आम्हां त्यांचें तें सर्व गौडबंगाल;
काय परंतु करावें, तो नव्हता योग्य भांडणा काल. ५
निरुपद्रवी बिचाऱ्या म्हाताऱ्याचें न त्या हंसें व्हावें,
म्हणुनी केवळ आम्हां त्या वेळीं मूग लागले खावे. ६
फसवुनि **पंजाब्यांना नागपुरीं** आणिली मवाळांनीं,
राष्ट्रसभा तरि आम्ही आड न आलों टवाळसेनानी. ७
फुगले मवाळ गर्वें प्रतिपक्षाचें कळे न बळ त्यांना;
म्हणती अध्यक्षाच्या योग्य नसे **बाळ** आमचा माना— ८
थोर हवेत कशाला, नागपुरींच्या चटोर पोरांनीं
जेव्हां मवाळ सैनिक सर्व पिटाळून लाविले रानीं, ९

रडती पडती दडती **मेथाजी**च्या समीप जाऊन;
म्हणती राष्ट्रसभेसह आतां होणार आमचा खून. १०
"तारा राष्ट्रसभेला **मेथाजी** ! ह्या जनांसही तारा !
"भार तुम्हां एकावर आहे हो आमचा तिचा सारा !" ११
द्रव **शेटजीं**स आला, जवळी होतेच **गोखले वाच्छा**;
म्हणती तयांस "चेष्टा नावडती ह्या मला टवाळांच्या." १२
एक विचार तिघांचा होउनि कांग्रेसकमिटि बोलविली;
आम्हांशिवाय सर्वीं त्यांच्या बोलास मान डोलविली. १३
आश्चर्य त्यांत हें कीं **दाजीसाहेब** आमचे फिरले !
सोडून आप्तमित्रां रिपुच्या गोटांत जाउनी शिरले. १४
धडपड पुष्कळ केली, तडजोडीचा विचारही केला;
हेतु परंतु मवाळीं अंतीं सिद्धीस आपला नेला. १५
लाजविली आळविली आर्जविली हात पाय जोडून;
**सुरते**स जाय तरि ती राष्ट्रसभा **नागपूर** सोडून. १६
घीशक्कर-लोभानें गुजराथ्यांचीच होय जी बचडी,
त्या सटवीस रुचावी कैसी ती नागपूरची खिचडी ? १७
तेंव्हांच कारटीचीं शकलें करणार दोन हे वीर;
अशरिणि परंतु वदली "थांबा थांबा जरा धरा धीर ! १८
" तुमच्या करेंच व्हावा अंत हिचा हें विधीकडे ठरलें;
"भोगूं द्या म्हणुनि हिला थोडें आयुष्य जें हिचें उरलें." १९

वांचावी ही ह्यांतचि आहे आम्हांस पूर्ण संतोष;
संपादो न परी ही आम्हां दुखवून आमचा रोष. २०
नादीं हिनें कधीं त्या मूढ मवाळांचिया न लागावें;
सोडून लाज भीडहि आम्ही सांगूं तसेंच वागावें; २१
अध्यक्षासाठीं ही, हिजकारितां तो नसेच अध्यक्ष;
मुद्दयाकडे हिनें ह्या लावावें प्रथम आपलें लक्ष. २२
तो **बाल पाल** किंवा **लाल** तिघांतून कोणत्या एका
घालावी माळ हिनें, मुख्य असे हाच आमचा हेका. २३
"**बाल** नकोच मला हें" कुठवर म्हणणार ही पुढें पाहूं!
काळ न आला तोंवर आम्ही हा चोंबडेपणा साहूं. २४
दुष्टदुराग्रहराहुग्रस्त **विपिनचंद्र** आमचा होय,
म्हणुनी नांव तयाचें काढायाची न राहिली सोय. २५
**बाला**ची आज अशी **पाला**ची लागली तशी वाट;
त्यांच्यासाठीं म्हणुनी तूर्त कराया नको थयथयाट. २६
आला परंतु समयीं होउनियां मुक्त आमचा **लाल**,
घालुनि माळ तया ही मग कां फुगवो न आपले गाल? २७
जनपदहितार्थ केवळ नरपतिदंडास जो सुखें साही,
वाजवितात यशाचा दुंदुभि ज्याच्या असा दिशा दाही, २८
तनुमनधन देशाच्या सेवेला नित्य लाविलीं ज्यानें,
राष्ट्रसभामुखमंडण **लाल** करो कां न तो स्वतेजानें? २९

अध्यक्ष **लाल** होतां रोष दुणावेल राज्यकर्त्यांचा;
आहे स्वभाव परि हा अधिकारारूढ सर्व मर्त्यांचा. २०

रोष किती दाखविला आम्हीं तो वंगभंग होतांच;
तेणें परंतु झाला सरकाराच्या मना किती जाच ? ३१

मग त्यांच्या रोषाची परवा आम्हां हवी कशाला ती ?
आम्हीं तोच धरावा, ज्या मार्गें राजरोस ते जाती. ३२

म्हणती मवाळ, आम्ही अर्ज्या करुनी स्वराज्य संपादूं;
आहे परंतु असली नकळे खरड्यांत काय त्या जादू. ३३

रडलें स्वराज्य त्यांचें !—अर्जहि कचऱ्यांत जाउनी पडले !
नाहीं परंतु लवही देशाचें कार्य त्यामुळें घडलें. ३४

झगडुनि भांडुनि शौर्यें सर्व जगाला करोनियां थक्क,
आम्ही जहाल म्हणुनी हिसकुनि घेणार आमचे हक्क ! ३५

अस्त्रें निजधामाला झालीं ऋषिमुनिसमागमें जातीं;
राहूं दिलें न एकहि सरकारें शस्त्र आमच्या हातीं. ३६

मार्ग प्रतिकाराचे म्हणुनी सगळेच खुंटले नसती;
न कळोत ते मवाळां, स्पष्ट जहालां परंतु ते दिसती! ३७

राजा शस्त्रास्त्रांचा आम्हांजवळी असे ‘ बहिष्कार ! ’
आहे ह्याच्यापेक्षां शस्त्राची तीक्ष्ण कोणत्या धार ? ३८

ह्या शस्त्राचा संतत चालवुनी एकसारखा मार,
टाकूं सर्व विदेशी धंदे व्यापार मारुनी ठार. ३९

ऐसा प्रसंग येउनि **इंग्लंडा**ची उपासमर झाली,
म्हणजे शरण तुम्हांला समजा ती **आंग्ल**मंडळी आली! ४०
म्हणतील "राज्य तुमचें आम्हां नलगे, तुम्हीच तें घ्या हो!
" इकडे आम्हांमागुनि फक्त तराजूच आमचें राहो!" ४१
कळतें आम्हां दुष्कर फार बहिष्कारयोग हा होय;
सांगा परंतु दुसरी ह्यावांचुनि कोणती असे सोय? ४२
हा न सुसाध्य, तथापिहि न कळे लोकांस आंतली गोम,
तोंवर ओरड करुनी ह्याचें कां माजवूं नये स्तोम? ४३
भीतात ओरडीला, तिकडे म्हणुनीच कान देतात;
जेरीस हे फिरंगी केवळ शब्दच्छलेंच येतात. ४४
यास्तव शब्दच्छलबलशाली आम्ही जहाल म्हणतों कीं,
मक्ता **राष्ट्रसभे**चा द्यावा आम्हांकडे तुम्हीं लोकीं. ४५
**सुरतें**त का न भरवा किंवा मसणांत कां न भरवा ती!
सूत्रें परी असावीं सर्व तिचीं नित्य आमच्या हातीं! ४६
हें नावडे मवाळां, त्यांना त्यांचाच पाहिजे पगडा;
चालू आहे सगळा इतक्यासाठींच आज हा झगडा. ४७
ही आमच्याच तंत्रें चालाया आमचाच अध्यक्ष,
हीस हवा, ह्याकरितां लागे तिकडेच आमचें लक्ष; ४८
त्या **भूपेंद्रसुरेंद्रीं** केली बुद्धया लंफागिरी नसती,
गत वर्षींच मनीषा झाली ही पूर्ण आमची असती. ४९

आधीं म्हणूनि यंदा **नागपुरीं** चांगली खबरदारी,
ठेवुनियां ती त्यांची लटपट हाणूनि पाडिली सारी. ५०
**मुंजे–खापर्ड्यां**च्या यत्नांचें तें फळास ये झाड,
तोंच तयावर पडती झाली **कांग्रेसकमिटि**ची धाड. ५१
**क**मिटीच्या अकलेची संगें देवोनि थोरली ठेली
**सुरते**लाच अचानक **राष्ट्रसभे**ची रवानगी केली ! ५२
राहो **बाळ**, परी त्या ठरवुनि **लाला** तसाच नादान
देती **रासविहारी** ! अध्यक्षाचा तुम्हांस ते मान. ५३
एकीकडे स्वगौरव, इच्छा दुसरीकडे समाजाची,
अटकुनि दुहींत ह्या मति तुमची झालीच पाहिजे काची. ५४
भानगडींत कशाला मग पडतां ह्या ? स्वयेंच माघार
घेउनि कां न म्हणा "हा त्रास नको ह्याहुनी बरी हार !" ५५
असते तुमच्या अंगीं त्या मानाला अवश्य गुण जे ते,
तरि हे जहालवीराचि आनंदानें तुम्हांस तो देते. ५६
पहिलें अध्यक्षाचें लक्षण–तो पाहिजे विशेष जरा
शिवरा, कीं न तयाविण टाळ्यांच्या रंग येतसे गजरा. ५७
दुसरें, हवा स्वदेशी वीरहि तो नखशिखांत, कीं लोकां,
देतां स्वराज्यदीक्षा स्पष्ट म्हणो तो !-' न दंड कां ठोका!' ५८
तिसरें, अंतर्बाह्य प्रखर असावा जहालही तो, कीं
तद्भापणेंच व्हावीं गरम नरम तीं खुळीं शिळीं डोकीं. ५९

चवथें, नरपतिदंडाघातव्रण त्याचिया हवा भाळीं;
तद्गौरवें पडो कीं दंडधरांची मुखप्रभा काळी. ६०
लक्षण **रास-विहारी** ! नसुनी ह्यांतील एकही अंगीं,
त्या अध्यक्षपदाच्या आपण पडतां उगाच कां ढंगीं ? ६१
वक्तृत्व थोर तुमचें थोरहि तुमची असेल विद्वत्ता;
आम्हां नसेल तुमच्या इतर गुणांचाहि लागला पत्ता; ६२
शब्दच्छलबल जैसें गाजविलें **लाल-बाल-पालांनीं**,
तैसें गाजविल्याचें आपण आम्हीं न ऐकिलें कानीं. ६३
देउनि यास्तव आपण अर्जाला आज आमच्या मान,
खालीं करा कसें तें अध्यक्षाचें न शंकतां स्थान ! ६४
ह्या तुमच्या कृत्यानें **मुंबइ**च्या अनभिषिक्त रायाचा
मुकुटहि असला खालीं कोसळुनी तो जरी पडायाचा; ६५
रागावेल सखा तो तुमचा **गोपाळ कृष्ण** रागावो,
जाईल सोडुनी तो मित्र तुम्हांला तरी सुखें जावो; ६६
आज परंतु तुम्ही त्या सर्व विचारांस सारुनी दूर
हारहि घेउनि आम्हां पूर्ण करूं द्या मनांतली हूर. ६७
झाली असह्य झाली **मेथा**ची फार त्या अरेरावी !
जावें जिथें तिथें तो आम्हां खालीं पहावया लावी. ६८
सारथ्य त्यांत करितो त्याचें **गोपाल कृष्ण** मायावी,
विजयश्री न कशी मग चालुनि त्याच्याकडे स्वयें यावी ? ६९

विजयभरांतचि राहुनि धुंद न कोणास ते कधीं पुसती,
वेडे पिसे तयांना—असुनि शहाणे—जहाल हे दिसती. ७०
आम्ही जें जें करितों त्यांत न ह्यांना बरें दिसे कांहीं;
कीं सर्वही बरेंपण ह्यांच्या कृत्यींच सांठुनी राही. ७१
घालूं न आज आम्ही त्यांच्या धुंदीस ह्या जरी आळा;
पडणार संकटांची निःसंशय आमच्या गळां माळा. ७२
द्याल जरी अर्जाला **घोष**! तुम्ही आज आमच्या कान,
उतरेल सर्व त्यांच्या धुंदीचें क्षण न लागतां मान. ७३
बघतां खऱ्या स्वदेशी वीरां नांवहि सहो न अर्जाचें;
त्याहुनि परंतु आम्हां आज निराशान्न आमची जाचे. ७४
आपत्काळीं नाहीं दोष महत्पापही जरी केलें;
आहेत सर्व ऋषिमुनि सांगुनि पूर्वींच तत्त्व हें गेले. ७५
दिल्लीस अर्ज धाडी स्वपित्यासाठीं न काय **शिवराज**?
आम्हांस कां हवी मग त्या कृतिची आज एवढी लाज? ७६
लाज नको भीड नको ध्यानीं आणूनि आमचा अर्ज,
आपण जन्ममहीचें टाका फेडोनि आपल्या कर्ज! ७७
खुर्ची अध्यक्षाची सांभाळाया तुम्हां पडो न जड;
न पडोत येउनी त्या राष्ट्रसभामंडपांतही दगड; ७८
यास्तव **रासबिहारी घोष**! पुन्हां आपणांस म्हणतों कीं,
माळ गळां **लाला**च्या घालुनि म्हणवूनि धन्य घ्या लोकीं? ७९

आपण म्हणाल **लाल**चि सिद्ध कुठें तो असें पुढें याया ?
तिळभर परी तुम्हां त्या गोष्टीची काळजी नको घ्याया. ८०

आम्ही जवळी असतां पाहूं म्हणतो नको कसा ?-**लाला**
ओढुनि बळेंच उचलुनि नेउनि खुर्चीत बैसवूं त्याला ! ८१

इतकें करुनि मवाळां भिउनि जरी तो त्यजील तें स्थान,
घेईल आपला तो करुनि जहालांकडोनि अपमान. ८२

कोणी कां न असो तो, यंदा जो बिघडवील हा डाव
याचा करावयाला आम्ही झटणार नित्य पाडाव. ८३

**मेथा-बानर्जीं**ची पूजा आम्ही करीतसों आज,
**लाला**ची तीच करूं जरि तो राखी न आमची लाज. ८४

**लाल** परंतु न वेडा, गोष्ट न तो ह्या थरास नेईल;
बोलास आमच्या तो आग्रह सोडुनि रुकार देईल. ८५

मन परि **रासबिहारी** ! तुमचें आधीं तुम्ही करा थोर,
म्हणजे सर्व मनाचा फिटला समजाच आमच्या घोर. ८६

मग होऊन हवें तरि **मेथा**च्या मजलशींतलीं घोडीं,
झाडुनि चार दुगाण्या आम्हीही मौज दाखवूं थोडी ! ८७

## ३. अभिनव धर्मसंस्थापना.

**धर्म** बुडाला ! गेला, **धर्म** बुडाला रसातळीं गेला !
केला जिकडे तिकडे संकर हा ! हा ! **सुधारकीं** केला ! १
धर्मावतार **बाजी** ज्या धर्माची करावया रक्षा
गेला **ब्रह्मावर्ती** स्वकुलयशाची करोनियां रक्षा; २
ज्याच्यासाठीं केवळ वसवुनि गंगातटाक आमरण
करिता होय महात्मा वर्षें बत्तीस तो पुरश्चरण; ३
हर ! हर ! त्या धर्माचे होतां पाहूनियां असे हाल
रडत असेल बिचारा म्हाणुनि नयनासवें सदा गाल ! ४
गेली अशेष **राया** ! पुण्याई ती तुझी लया गेली,
स्वारी आज कलीनें **पुण्यपुरी**वर म्हणोनि ह्या केली ! ५
पुण्यचि सरलें म्हणुनी धांवा संतत असोनिही केला,
आम्हां **पुणेकरां**च्या देवहिं देती न कान हांकेला ! ६
देव **खुन्या मुरलीधर** तो **भांग्या मारुती**हि आठविला;
सोटा घेउनि याया अर्ज **म्हसोबा**कडेहि पाठविला. ७
रुसले परंतु कां ते नकळे ममताळु आमचे देव !
म्हणत्ति—तुम्हीच करा जा भूसुर हो आज ही उठाठेव ! ८
घ्यावें **जगद्गुरूं**चें साह्य, तरी आपलीच फिर्याद
करुनि पुढें म्हणती ते 'मिटवा हा प्रथम आमचा वाद !' ९

अहह ! **सनातनधर्मा** ! तुजवर पडला असोनि हा घाला
कोणी साह्य करीना आज तुला काय रे अनाथाला !!! १०
सोडूं नको नको रे बापा **धर्मा** ! तथापि तूं धीर !
मागें तुझ्या हजारों असती हे विप्रवीर खंबीर ! ११
भीतोस तूं कशाला मोडाया हें सुधारकी बंड ?
आहोंत सिद्ध आम्ही **पुण्यपुरीं**तील धर्ममार्तंड ! १२
या हो या भटभिक्षुक ! शास्त्रिपुराणिक ! पहातसां काय ?
शिरला पाय **कली**चा शिरला तुमच्या **पुण्यां**त ह्या पाय ! १३
आहां कुठें तुम्ही ? त्या **धर्मसभा** काय झोंप घेतात ?
लाज असों द्या कांहीं ! स्वर्गीं म्हणतील काय ते तात ? १४
देव बिचारे श्रमुनी स्वस्थ समाधिस्थ जाहले सारे !
नायकती हांकांना नुघडिति ठोकूनि पाहतां दारें. १५
नाहीं तहान भूकहि म्हणुनी ते लोळती सदा शयनीं;
करितां आपण तैसें बसतील प्राण येउनी नयनीं. १६
चरितार्थाचें साधन धर्माविण अन्य आपणां नाहीं;
देउनि वर्णगुरुत्वा तोच सदा भार आपला वाही. १७
धर्मावनीं जरी ते म्हणुनि उदासीन राहिले देव,
ही पाहिजेच आपण रक्षियली नित्य आपली ठेव ! १८
त्यांत सनातन तुमचें वडिलार्जित मुख्य होय हें वतन,
यास्तव तुम्हीं द्विजांनीं ह्याची केलीच पाहिजे जतन ! १९

असते पुणेंकरांची धर्माच्या रक्षणीं उडी पहिली—
भूमंडळांत तुमची गाजे सर्वत्र कीर्ति ही वहिली. २०
रक्षीतसां स्वधर्मा आपण सारोनि नित्यकर्माला,
म्हणुनी अशा स्थितीला आज महाराष्ट्रदेश हा आला. २१
राव असो रंक असो शंका येतांच कर्मलोपाची
लाट उसळली तुमच्या विश्वामित्री महोग्र कोपाची. २२
स्मृति म्हणती प्रकृतीवर दृष्टि कलीची पडोनि रोग जडे,
करजानुहीन होउनि तेणें **प्रभुचा विराट**देह पडे. २३
झाले अशा प्रकारें **वैश्य क्षत्रिय** असोनिही नष्ट;
**क्षत्रिय** म्हणवुनि घ्याया पाहे **शिवराय** आपणा स्पष्ट. २४
स्पष्टोत्तरें तयाचा आपण केला परंतु धिक्कार !
तुमची निस्पृहता ही लोकीं अद्यापि वाणिती फार. २५
धर्मावनार्थ आपण जातींजातींत माजवूनि कळी,
अंतःकलहाग्नीला राज्याचाही दिला न काय बळी? २६
काय तदर्थ **पुण्या**च्या अकलेची गाढवावरी धिंड
काढुनि दिला न आपण सभ्यपणाचाहि आपल्या पिंड? २७
जेव्हां वररायांच्या हक्कांवर कायदा गदा घाली,
नयनीं वरमायांच्या न्हाणवल्यांच्याहि आंसवें आलीं, २८
अभय तयांना देउनि त्यांच्या संरक्षणार्थ त्या कालीं
कोण तुम्हांविण धांवे स्मृतिवचनांच्या उभारुनी ढाली? २९

शरणपुरींत **पुण्या**च्या करिती निःशंक जे चहापान,
उपटावया तयांचे कोण तुम्हांविण पुढें सरे कान? ३०

तीर्थप्रसाद केवळ देउनि पावन तयां करूं जातां
थरथर **जगद्गुरूं**च्या कोण तुम्हांवीण कांपवी हाता? ३१

जातां सुधारकचमू **राष्ट्र**सभामंडपा विटाळाया
कोण तुम्हांविण शकला मागें रागें तिला पिटाळाया? ३२

हां हां म्हणतां आपण वेदोक्ताचें उभारुनी बंड
केले जगद्गुरूंच्या गादींचेही न काय हो खंड? ३३

असले प्रतापशाली वीर तुम्ही धर्मरक्षणा जेथें
धर्मावरी कसें ह्या यावें नकळे अरिष्ट हें तेथें! ३४

आलें, तथापि आपण पळहि उपेक्षा करूं नका याची!
धर्मग्लानि न येणें तुमचीही मानहानि व्हायाची! ३५

हें धर्मरक्षणाचें आज न आपण जरी करूं काम,
जन म्हणतील '**पुण्याच्या** नाहीं भटजींत राहिला राम!' ३६

विघ्नें निवारिलीं तीं कस्पटशीं मागलीं तुम्हीं सारीं;
आतां परंतु येउनि बसला हा **विघ्नराज** शेजारीं. ३७

पुढचें भविष्य आपण जाणत असतांहि राहिलों स्वस्थ,
म्हणुनी **कलि**रायाचें इतकें हें आज माजलें प्रस्थ. ३८

येती **कली**सवें ह्या त्याच्या बहिणीहि **इंग्रजी** शाळा;
धर्मपराङ्मुख आधीं करिती त्या आमच्या मुलांबाळां. ३९

शाळा न ह्या विशाळा धर्मशरीरास झोंबल्या जळवा !
शोषून सार अंतीं बघती त्याचा करावया पळवा. ४०
मागुनि सुधारकांच्या जन्मा येउनि जिथें तिथें टोळ्या
म्हणती 'जुन्या पुराण्या आचारांच्या करूं चला होळ्या !' ४१
संध्या हवी कशाला ? म्हणती—पूजा निरर्थ कां दगड ?
करिती स्वाध्यायाची थट्टा वडिलांसमक्षही उघड; ४२
म्हणती **श्रुतिस्मृतींचें** आटपलें सर्व येथलें काम;
द्या पाठवूनि त्यांना ध्याया **शार्मण्य**भूत विश्राम ! ४३
ब्राह्मण असोनि शूद्रोदक घेतां हे न लाजती भ्रष्ट !
झालें स्वराज्य म्हणती तुमच्या ह्या सोंवळ्यामुळें नष्ट ! ४४
घेती न हे कधींही **पितरांचा** आपल्या समाचार,
श्राद्धीं तथापि म्हणती भिक्षुक जेवोनि मातले फार ! ४५
म्हणती गृहिणींना हे—'राहो घरकाम, पुस्तकें वाचा;
सोडुनि कुलमर्यादा स्वच्छंदें नाचवूं तशा नाचा.' ४६
**गार्गीमैत्रेयींच्या** बहिणी ह्या ब्राह्मणांस पाहून
म्हणती स्वातंत्र्याचा केला ह्यांनींच आमच्या खून ! ४७
सुटली कुलमर्यादा, कोण पुसे त्या तिथें कुलाचारां !
म्हणती—'भटजी ! आतां व्रतवैकल्यें तुम्हीच तीं सारा !' ४८
दिवट्या सुधारणेच्या पाजळुनी ह्या अशा चुलीपाशीं
स्पर्धा करूं पहाती हे त्या मन्वादि धर्मदीपांशीं ! ४९

म्हणतात हे मुलींच्या लग्नाचें वाढवा वयोमान,
ह्यांना परंतु त्याच्या परिणामांचें कुठें असे भान ? ५०
असल्या प्रौढ सुनेच्या कानाला लावितांक्षणीं हात
राहील काय वदनीं सासूच्या एकही तरी दांत ? ५१
पंडित विवाहदीक्षा म्हणती विधवांस हे पुन्हां द्यावी,
नकळे परंतु ह्यांना कोणीं हातांत लाटणीं घ्यावीं ! ५२
नित्य विचार अमंगळ असले चित्तांत घोळती ज्यांच्या,
आचारांत रहावी कैशी मग ती पवित्रता त्यांच्या ? ५३
जाती निर्भय, करिती भ्रष्ट **इराण्या**कडे चहापान;
म्हणती मदिरापानें गोऱ्या लोकांत वाढतो मान ! ५४
आपादशीर्ष करुनी पोषाखाचा विलायती थाट,
धरिती **पालनजी**च्या हाटेलाची न शंकतां वाट ! ५५
बसती मेजाभंवती, बघती खिस्ती न वा मुसल्मान !
भेद कशाचा म्हणती ! प्रभुचीं सारीं मुलें समसमान ! ५६
जाती **विलयते**ला **काशी मथुरा प्रयाग** सोडून;
खाती पिती हवें तें ज्ञातीचे नीतिबंध तोडून . ५७
हटकूं जातां म्हणती कसलें खाण्यापिण्यामधें पाप ?
**चोख्यामेळ्या**संगें काय **विधी**चा न जेवला बाप ? ५८
मांजर बघतां ह्यांच्या रक्ताचा लेशही नुरे ओष्ठीं,
मग त्या हव्या कशाला देवांच्या पामरांस ह्या गोष्टी ? ५९

तो गिरि धरी नखाग्रीं, पागोटीं ह्यांस जाहलीं भारी !
सोळा सहस्र त्याच्या, ह्यांना तों एक नावेरे नारी ! ६०
देवचरित्र असो तें, झाले हे खेळ आजपर्यंत;
नकळत म्हणुनि मनाला त्यांच्या वाटे न फारशी खंत. ६१
आतां परंतु निर्भय धर्माशीं चालवावया वैर
ह्यांनीं विडा उचलिला आहे वागुनि हवें तसें स्वैर ! ६२
तो कर्मलोप कोठें !–कोठें मनसोक्त वर्णसंकर हा !
परिहार होय त्याचा, हा तों पतितां म्हणे पडून रहा ! ६३
दुर्दैव ह्या **पुण्या**चें, म्हणुनि अशी ही कुबुद्धि आठवली !
सांठविली वडिलांनीं पुण्याई ती अशेष आटविली ! ६४
ब्राह्मण असोनि भक्ष्याभक्ष्यविचारांस हे रजा देती;
जिनगर-महार-मांगां पंक्तीला उघड आपल्या घेती ! ६५
पंक्तीलाच न घेती करिती लोकीं प्रसिद्ध ते चार !
आव्हानिती तुम्हांला, म्हणती 'घ्या आमचा समाचार !' ६६
प्रत्याव्हान तुम्हीही त्यांस तरी द्याच ठोकुनि दंड !
राखा लाज **पुण्या**ची मोडुनियां हें सुधारकी बंड ! ६७
कळवा त्या भंडांना **पुण्यपुरीं**तील धर्ममार्तंड
थंडावले न तोंवर, न पडे धर्मावनव्रतीं खंड ! ६८
घेउनि चला बरोबर सामुग्री सर्व मंत्रतंत्रांची;
भरवा सभा उघडुनी दारें सारीं गटारयंत्रांचीं. ६९

उग्र स्वरूप इथल्या ग्रामण्याचें करोनियां प्रकट,
शतधा विदीर्ण करुनी टाकूंया तो सुधारणाशकट ! ७०
धर्माच्याच उरावर द्याया जे सिद्ध जाहले पाय,
शासन तयां करावें प्रायश्चित्तेंदुशेखरें काय ? ७१
प्रायश्चित्तें देउनि ह्यांची नाहींच शुद्धि व्हायाची !
धांव मनाची ह्यांच्या फिरुनि अधर्माकडेच जायाची ! ७२
उपडोनि ह्या **पुण्यां**तुन जों नाहीं टाकिलें तिचें मूळ,
तोंवरि सुधारणेचें नाहीं होणार नष्ट हें खूळ ! ७३
वेद अहर्निश म्हणुनी लावुनि घोकावया मुलांबाळां,
ओस पडूं द्या त्यांच्या आधीं त्या सर्व इंग्रजी शाळा ! ७४
नाकझरींत भराभर त्यांचीं फेंकोनि द्या बुकें सारीं !
श्वानहि सुधारकांचें येऊं देऊं नका कधीं दारीं ! ७५
बोलावया सुधारक कोणी उठतां कधीं सभास्थानीं
सांगा जनांस—'घाला बोळे तत्काळ आपल्या कानीं !' ७६
जातील हव्यकव्या कोणी जे त्यांचिया घरीं विप्र,
काढा धिंड तयांची बैसवुनी गाढवावरी क्षिप्र ! ७७
मिळवुनि न्हावी धोबी गवळी माळी महार चांभार
सांगा तयांस,—ह्यांच्या होतो अंगांत भूतसंचार. ७८
जर्जर अशा प्रकारें करुनि बहिष्कारशस्त्रधारांनीं,
लावा सर्व सुधारक भीड न धरितां पिटाळुनी रानीं ! ७९

उपडुनि पाखंडाचा शीघ्र असा टाकितांच हा कांटा,
होतील आपणाला सिद्धीच्या सर्व मोकळया वाटा. ८०
संस्थापना पुन्हां ह्या धर्माची मग करोनियां नीट,
अक्षय पुण्यपुरी ही ग्रामण्याचें करूं महापीठ! ८१
होतां सहस्रभोजन एकामागून एक त्या काळीं
आपण म्हणाल—'जागृत धर्माची भावना पुन्हां झाली!' ८२
ही भावना जगांतुन सारें पाखंड दूर पळवील;
सर्व जनांस सनातन धर्माचें ह्या महत्त्व कळवील. ८३
विप्र त्रिकाल संध्यावंदन नियमें करीत जातील;
दक्ष सदा नरनारी देवद्विजपूजनीं रहातील. ८४
सगळया जुन्यापुराण्या व्रतवैकल्यांस येउनी ऊत
बसतील आदरानें विप्रांचे पाय बायका धूत. ८५
गोभूहिरण्यदानें घेतां घेतां नको नको जीव
होउनि भिक्षुक म्हणतिल—'देवा! ह्या संकटांत वांचीव!' ८६
पडतां गृहीं द्विजवधू धनवसनांचे ढिगार पाहून,
म्हणतील—'राव बाजी देता तो अधिक काय याहून?' ८७
पाहुनि सद्धर्माची अभिनव संस्थापना अशी झाली,
जन म्हणतील 'जगाला सत्ययुगाची कळा पुन्हां आली?' ८८

REFBK-0001470

REFBK-0001470